# पक्ष्यांचे नंदनवन - सिक्किम

( प्रवासवर्णन )

लेखिका: सौ. प्रतिभा गोरे | छायाचित्रे: दिलीप गोरे



Green Magpie

Fire-tailed Myzornis

Red-billed Leiothrix

Himalayan Bluetail

Spotted Laughingthrush

Green-tailed Sunbird

Bar throated Minla

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# पक्ष्यांचे नंदनवन - सिक्किम

(प्रवास वर्णन)

लेखिका : प्रतिभा गोरे

छायाचित्रे : दिलीप गोरे

# पक्ष्यांचे नंदनवन - सिक्किम

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल

अणि ई साहित्य बद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला

## पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळमत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# पक्ष्यांचे नंदनवन - सिक्किम

लेखिका : प्रतिभा गोरे

छायाचित्रे : दिलीप गोरे

पत्ता – दिलीप दत्तात्रय गोरे, परेश अपार्टमेंट्स

२३५/ बी /२, पर्वती , पुणे४११००९

मो. ९९२१७३६२०८

Gmail : dilipdgore@gmail.com

पुस्तक रचना व निर्मिती : --------------------- (९८----------)

या पुस्तकातील लेखनाचे व छायाचित्रांचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य ,चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १८ मे २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणा साठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



**सौ. प्रतिभा गोरे, शिक्षण** BCom. **गृहिणी. प्रापंचिक सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर आलेलं रिकामपण, प्रवासाची व निसर्गात फिरण्याची आवड त्यामुळे गोरेंच्या पक्षी निरीक्षणात सहभागी झाले. प्रवासात खाणे पिणे, रहाण्याची जागा ह्या सर्व बाबतीत खूपच एडजस्टमेन्ट करावी लागते. ती करण्याची आम्हा दोघांची तयारी असल्यामुळे आम्हाला अजूनपर्यंत कधीही अडचण आली नाही. आता कॅमेरा हातात आल्यामुळे व त्याचा सराव होत असल्यामुळे नवीन काही तरी केल्याचा आनंद मिळत आहे. तशी मला वाचनाची आवड नाही परंतु केव्हातरी प्रसंगानुरूप कविता मात्र केल्या. आतापर्यन्त भारतातील सुमारे २० राज्यांमध्ये पक्षांच्या अधिवासाच्या जागा पाहिल्या. आपल्या देशातील विविधता पाहून भारत खरोखरच अतुल्य आहे याबद्दल खात्रीच पटली. आम्हा उभयतांना शक्य होतील तेव्हढ्या पक्षी प्रजाती पाहण्याची इच्छा आहे.**



दिलीप गोरे, शिक्षण MSc, नोकरी पुणे येथील आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेज मध्ये, कामाचे स्वरूप टेक्निकल. निसर्ग, वाइल्ड लाईफ, पक्षी ह्या बद्दल आवड होती परंतु घरच्या जबाबदाऱ्या व नोकरी ह्यामुळे पूर्ण वेळ कधीच देता आला नाही. निवृत्त झाल्यावर मात्र पूर्ण वेळ देण्याचे ठरविले. Ornithology चा कोर्स केला काही बेसिक माहिती मिळाली. एक बायनॉक्युलर व बऱ्या पैकी कॅमेरा यांच्यासह सुरवात केली. सौ. प्रतिभाही ह्यात सामील झाली. प्रवासाची आवड दोघांना होतीच व प्रवासाचा त्रासही होत नव्हता. त्यामुळे अजूनपर्यंत सुमारे ८ वर्षे पक्षी निरीक्षण व फोटोग्राफी चालू आहे. ह्यातून मिळणारा आंनद खरोखरच अवर्णनीय आहे. पुस्तक लिहिण्याची ही पहिलीच वेळ. निसर्ग, प्राणी, पक्षी ह्यांच्याशी सम्बधित पुस्तके वाचायला आवडतात. आत्तापर्यंतच्या फोटोग्राफी मध्ये फोटोंशिवाय बरेच व्हिडीओ घेतले आहेत. त्यांचा वापर करून एखादा शो तयार करण्याची कल्पना आहे. जो नंतर शाळेतील विद्याथ्यांना दाखविता येईल तसेच त्यांच्यामध्ये ह्या विषयाची गोडी निर्माण करणे शक्य होईल.

# मनोगत

मी पुणे येथील आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेज मधुन २००९ साली निवृत्त झाल्यावर पुण्याच्या गरवारे कॉलेज मधून पक्षीनिरीक्षण शास्त्र (ornithology) हा एक पार्ट टाइम कोर्स केला. ह्या कोर्स मध्ये पक्षी म्हणजे काय येथपासून पक्ष्यांची शरीर रचना, शरीर क्रिया, त्यांचे अधिवास, त्यांच्या सवयी, स्थलांतर इत्यादी विषयी वेगवेगळ्या तज्ञांची भाषणे व काही फिल्ड ट्रेनिंग मिळाले. कोर्समध्ये वेगवेगळ्या वयोगटातील व वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारे कोर्समेट होते. त्यांच्या ओळखी झाल्या. सुमारे ४० वर्षानंतर पुन्हा एकदा विद्यार्थी म्हणून बेंचवर बसायला मजा वाटली. भारतात पक्षांच्या सुमारे १२५० प्रजाती आढळतात. ही माहिती कोर्स मध्ये मिळाली. आपल्याला जेव्हढ्या शक्य होतील तेव्हढ्या प्रजाती पाहण्याचा विचार मनात आला. प्रथम पुण्याजवळील, नंतर महाराष्ट्रातील इतर ठिकाणी पक्षी बघायला जाऊ लागलो. माझ्याबरोबर सौ. प्रतिभा सुद्धा येऊ लागली व तिलाही या क्षेत्रात गोडी निर्माण झाली. आम्हाला प्रवासाची आवड होतीच व आता रजेचा प्रश्न नव्हता. त्यामुळे दुसऱ्या राज्यात प्रवास सुरु झाला. प्रथम आमचा प्रवास किल्ले, देऊळे इथपर्यंत मर्यादित होता. परंतु आता मात्र फक्त निसर्ग व पक्षी यासाठी प्रवास होऊ लागले. ह्या काळात भारतातील सुमारे २० राज्यातील पक्ष्यांच्या अधिवासाची ठिकाणे पहाण्यात आली व सुमारे ६०० प्रजाती बघितल्या. पक्ष्यांशिवाय भारतातील विविध प्रांतातील लोक, त्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयी, त्यांचे स्वभाव, तेथील रस्ते, निसर्ग, हवामान ह्या विषयी सुद्धा खूपच माहिती मिळाली. खूप ओळखी झाल्या व असे वाटले की आपल्या देशातच अजून खूप विविधता आहे जी आपण पाहिलीच नाही.

सिक्किम मध्ये प्रथम मी डिसेम्बर २०१६ मध्ये गेलो. त्या वेळी माझ्या दोन मित्रांबरोबर आम्ही कारने पुणे ते गंगटोक असा प्रवास केला. तेव्हा फक्त लॉन्ग ड्रायविंग साठी प्रवास झाला. त्यानंतर आम्ही उभयतां एप्रिल २०१७ मध्ये व नंतर पुन्हा पक्षी निरीक्षणासाठी एप्रिल २०१८ मध्ये गेलो होतो. त्यानंतरचा

हा प्रवास. तरी ह्या वेळी लाचेन, लाचुंग हा उत्तर सिक्किम मधील भाग तेथे प्रवेश न मिळाल्यामुळे राहिलाच. सिक्किममध्ये बऱ्याचशा गोष्टी हवामानावर अवलंबून असतात.

प्रवास वर्णन लिहिण्याची माझी ही पहिलीच वेळ. माझे एक आते बंधू कै. ती. विश्वनाथ केळकर मला नेहमी प्रवास वर्णन लिहिण्याचा आग्रह करायचे. त्यांची एक छान सवय होती, ते अगदी छोट्या प्रवासाचे सुद्धा वर्णन लिहीत व त्यांच्याकडे गेलो की आम्हाला वाचायला देत. काही ना काही कारणामुळे लिहिणे काही झाले नाही हे खरे. परंतु ह्या वेळी सौ. प्रतिभाने ह्या प्रवासातील एक एक स्थळाचे वर्णन तिच्या मोबाईल वर टाईप केले व तिच्या बहिणींना पाठविले. त्यांनी हे पुस्तक रूपात प्रसिद्ध करण्याचा आग्रह धरला. तिच्या मोठ्या भगिनी सौ. आसावरी काकडे ह्यांनी ई बुक बद्दल सांगितले व आम्हाला प्रेरणा दिली. ह्या पुस्तकातील जवळ जवळ सर्व मजकूर सौ. प्रतिभाने लिहिला आहे. माझा सहभाग फक्त फोटो संबंधी तांत्रिक माहिती, फोटो व टाइपिंग एवढाच आहे. आमचा एक महिन्याचा हा प्रवास सुखकर करण्यात गजोलडोबा येथील बोटमन तपस, लाटपंचर चे श्री. पदमजी गुरुंग व सुषमाजी गुरुंग, गाईड्स संजय व ऊर्जेन व आमचे सारथी जीवन छेत्री व विनय यांचा बहुमोल वाटा आहे. जरी हा त्यांच्या व्यवसायाचा भाग असला तरी त्यांनी दाखविलेली माणुसकी व आत्मीयता ह्यामुळेच आम्ही आमची मोहीम आरामात पूर्ण करू शकलो व आपणासमोर मांडू शकलो. हे पुस्तक तयार करण्यात मला माझे मित्र श्री. सुरेंद्र गोडसे यांची खूपच मदत झाली.

आमचा हा पहिला प्रयत्न प्रकाशित करण्यात ई साहित्य प्रकाशन ने दिलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

दिलीप दत्तात्रय गोरे, पर्वती, पुणे ४११००९ (dilipdgore@gmail.com)

मोबाईल : ९९ २१७ ३६ २०८ (ह्या सहली बद्दल कोणास काही माहिती हवी असल्यास, अथवा काही फोटो अगर व्हिडीओ पहायचे असल्यास आपण अवश्य फोन करावा. )

## मनोगत

घरच्या जबाबदाऱ्या, मुलांची शिक्षणं, लग्न, नातवंडे सगळे टप्पे पार करून आम्ही दोघे पंख लावून भरारी घेण्यास सज्ज झालो. कॅमेरा आणि मोबाईल हातात होताच. पुरेसा पैसा, भरपूर वेळ आणि महत्वाची म्हणजे हौस, उमेद, उत्साह, दोघांची एक आवड, एक निवड, एकी इतकी शिदोरी पंख लगाकर उडनेके लिए काफी थी । एकावर एक ट्रिप आखल्या जात होत्या. बाहेर पडत होतो. २०/२५ दिवस फिरून परतत होतो. ४/८ दिवसात परत पुढच्या ट्रीपच्या बॅगा भरल्या जायच्या. सगळ्यांना हेवा वाटावा असे मंतरलेले दिवस. मग काय काय मज्जा आली, केली ते सांगितले जायचे. तू काही लिहिलेस की नाही? अगं लिहीत जा. नंतर वाचायला मजा येते. इथपासून तिथपर्यंत बराच आग्रह निरनिराळ्या व्यक्तींकडून होत गेला. पण कधीही पेन उचलले नाही. शाळा कॉलेज संपले. लग्न झाले. लहानपण, आई - वडील, बहीण - भाऊ, मैत्रिणी सगळे सगळे भूतकाळाच्या स्वाधीन केले आणि भविष्याला सामोरी गेले. पेन पण माहेरीच सोडून आले.

वारंवार सांगितले जात होते " लिही, लिही ". खुद्द सासूबाईही सांगून दमल्या. आतून कधी काही लिहावे असे वाटलेच नाही. वेळ प्रसंगांनी कविता लिहिल्या गेल्या. कौतुकही होत गेले. पण त्याही तेव्हढ्या पुरत्याच लिहिल्या गेल्या. ट्रीपला जाऊन, पक्षी बघून, आता साधारण ८ वर्षे झाली. गेल्या वर्षी आसाम, अरुणाचल, दिल्लीची महिनाभराची ट्रिप झाली. मधून मधून खुशालीचे फोन व्हायचे. माईचा फोन आला. गाडी पळत होती. लाईव्ह कॉमेंटरी चालू होती. तिने परत बजावले. इतके छान बोलते आहेस तर लिहून ठेव. नंतर आठवत नाही. व्हाट्सअपवर गप्पा चालायच्या. रेंज नाही, डाउनलोड होत नाही, सेंड होत नाही. अशा सगळ्या अडचणी कायम बरोबर होत्याच. कॅमेरातील फोटो सेंड करायचा कसा ? त्या ट्रिपमध्ये ग्रॅन्डला नावाचे निळे पक्षी बघण्यासाठी (जे साधारणतः १२००० फूट उंचीवर दिसतात) अतोनात अट्टाहास केला होता.

पहाटे साडे तीनला बाहेर पडलो, सहा पर्यंत पोचायचे होते. वाटेत जे काही दृश्य बघितले त्याचे मोबाइलमध्ये फोटो घेता आले नाहीत. मोबाईलने परत जबरदस्त दगा दिला. आडमुठ्यासारखा अडून बसला. फक्त मेसेज सेंड होत होते. जे काही विलोभनीय दृश्य बघितले ते आनंदातिशयाने शब्दरूप घेऊन मोबाईलच्या माध्यमातून माईकडे जाण्यास सज्ज झाले. लिहिण्याशिवाय आता काहीही पर्याय नव्हता. की बोर्डवर बोटं फिरवत शब्दांच्या कुंचल्यातून जे जे पाहिले ते ते रेखाटत गेले. अप्रतिम लेखन उमटत गेले. ते लेखन होते की चित्र? कुणी काढले होते? ती मी नव्हतेच ....! हो, ती मी नव्हते नक्कीच. ती लिहिणारी, शब्द चित्रांची रचैती माझ्या कडून करवून घेणारी असंख्यांची आणि माझ्या माईची इच्छाशक्ती माझ्याकडून शब्दचित्र रेखाटून घेत होती. अवती भवतीच्या जिव्हाळ्याच्या माणसांच्या लेखनाच्या अपेक्षा माझ्याकडून लिहवून घेत होत्या. गाडी धावत होती. निसर्ग डिक्टेशन देत होता आणि माझी बोटं मोबाईलवर थिरकत होती. लेखन रंगात आले होते. अचानक मोबाईलची बॅटरी संपली. शाई संपली असे लिहून मी मेसेज सेंड केला. हातोहात माईचा मेसेज- छान लिहिते आहेस. शाई संपली चालणार नाही. दुकान दिसले की लगेच पेन खरेदी कर. मी लिहिलं, अगं शाई संपली म्हणजे मोबाईलची बॅटरी संपली. आम्ही दोघी हसलो आणि तिने डोक्याला हात लावला. अशी सगळी गंमत.

त्या लेखनाचे सगळ्यांनी भरभरुन कौतुक केले. सगळ्यांचे मेसेजेस येत होते. शब्दांमधून चित्र निर्मितीची कला उत्तम. थेट बघितल्याचे समाधान मिळाले. फोटो पेक्षा शब्दचित्र अधिक काही हृदयापर्यंत पोचवत असते. फोटो निर्जीव वाटला असता. पण लेखन व्हिडीओ दाखवतो. मग माझे मीच परत वाचले आणि माझ्या भुवया उंचावल्या. बापरे, खरंच की आपण छानच लिहिले आहे. नंतर गोरेंना पण दाखवले. लेखन आणि मेसेजेस. गोरेंनी लेखनाचे स्वागत केले. मग काय आता लेखनाची चटकच लागली. लिहीत राहिले. छोट्या मोठ्या ट्रिप मोबाईलच्या माध्यमातून जवळच्या लोकांना घर बसल्या घडू लागल्या.

६/७ महिने उलटले होते. नवीन ट्रिपचे दिवस जवळ आले. घराबाहेर पडताना ताईने आठवण केली. लिहायला विसरू नकोस. लिहीत रहा. पण या

वेळेला गोरेंनी कॅमेरा दिला होता. मग लेखन पडले मागे. कॅमेऱ्यामुळे आता खरे पक्षी कळत होते. निराळीच मजा या ट्रीपमध्ये अनुभवता आली. कॅमेरा, फोटोग्राफी सगळेच नवीन होते. घरी आल्यावर ताईच्या शब्दाला आणि इच्छेला मान देऊन लेखन सुरु केले. १०/११ भागात सिक्किमची ट्रिप लिहिली गेली. आता माईची भूमिका संपली आणि ताईने दोऱ्या हातात घेतल्या. पुस्तक निर्मितीचा प्रवास सुरु झाला. गोरेंनी गेल्या वर्षी पुस्तक काढण्यासाठी शब्द दिला होता आणि तेही मैदानात उतरले. दिलीप, भास्करनीही टेकू देऊन पुस्तक निर्मितीची प्रक्रिया उचलून धरली.

करोना लॉकडाऊन सुरु झाला. रिकामा वेळ ... काय करणार ? ई बुक ची कल्पना पुढे आली. पुस्तक निर्मिती व्हायची होती ना ! तशी पुरक परिस्थिती निर्माण झाली " पक्ष्यांचे नंदनवन - सिक्किम " नावाने पुस्तकाचे काम सुरु झाले.

३ मे ला पहिल्या स्टेपवर टायपिंगचे काम पूर्ण झाले. माझा मुलगा परागही लॉकडाऊन मुळे थोडाफार रिकामा सापडला. त्याने कव्हरचे काम मनावर घेतले आणि कामाला सुरवात केली. सर्वांच्या इच्छा फळाला आल्या आणि आमचे पहिले पुस्तक तयार झाले.

सौ. प्रतिभा दिलीप गोरे (मो. ९४०४२३४३४०)

कव्हर पेज : पराग गोरे (मो. ९८९००४००१३)

**ज्या माझ्या दोघी मोठ्या बहिणींनी,**

**मला हे पुस्तक लिहिण्यास प्रवृत्त केले,**

**त्या सौ. वैशाली लेले व सौ. आसावरी काकडे यांस ........**

**सौ. प्रतिभा गोरे**

## अनुक्रमणिका

१. प्रस्तावना .............................................. १३

२. पाणपक्ष्यांचे संमेलन - गजोलडोबा...............१६

३. सिंकोना वृक्षांच्या परिसरात - लाटपंचर...... ३०

४. बुद्धाचा वरदहस्त - केवजिंग .................... ३९

५. छोट्या पक्ष्यांची शाळा - बोरांग..................४७

६. वारसे ऱ्होडोडेंड्रॉन सँक्चुअरी - ओखरे.......... ५८

७. निसर्गरम्य खेडे गाव - मारतम ................ ६५

८. कांचेनजुंगाच्या परिसरात - कालूक............. ६८

९. बी गार्डन - हावरा ( कलकत्ता )..................८१

# प्रस्तावना

**सिक्किम - भारतातील एक छोटस राज्य. निसर्गाने मुक्त हस्ताने दिलेलं वरदान. बर्फाच्छादित पर्वतरांगा, अनेक प्रकारचे वृक्ष, वेली, झरे, नद्या, धबधबे, रानफुले, ऑर्किड्स, आणि तळी. असा निसर्ग म्हणजे पक्ष्यांसाठी आणि पक्षी निरीक्षकांसाठी नंदनवनच. भारतात आढळणाऱ्या सुमारे १२५० पक्षी प्रजातींपैकी सुमारे ५५० प्रजाती सिक्किममध्ये आढळतात. ह्या आधी दोन तीनदा सिक्किममध्ये गेलो होतो. परंतु पक्षी निरिक्षण फारसे झाले नव्हते म्हणून ह्या वेळेला आम्ही पक्षी निरीक्षणासाठी जाण्याचे ठरविले. थंडीच्या दिवसात जास्त उंचीवरील पक्षी खाली येतात. त्यामुळे थोड्या श्रमात बरेच काही साध्य होते. जे आमच्या वयाला आवश्यकच होते.**



**सिक्किम मधील नयनरम्य छांगु लेक**

**सर्व अटी - तटिंना मागे सारत कांचेनजुंगाच्या ओढीने आम्ही घर सोडले. सिक्किमच्या ह्या आधीच्या प्रवासात ढग, धुके, पाऊस ह्यामुळे कांचेनजुंगा**

कधी सुस्पष्ट दिसलेच नव्हते. सिक्किमला जाण्यासाठी पुण्याहून प्रथम पुणे हावरा आझाद हिंद एक्स्प्रेसने दि. ३० डिसेंबर २०१९ रोजी निघालो. गाडीतून बाहेर बघत असताना गाडीच्या गतीने पुण्यातील मरगळ मागे टाकून आम्ही नवा उत्साह भरून घेत होतो. रात्रीची झोप झाली तशी पुणे भूतकाळात विलीन झाले. आम्ही भविष्याला सामोरे जात सह प्रवाशांच्या सोबत रमून गेलो. हळूहळू पुणेकर मंडळी अधेमधे उतरत होती. नवीन माणसे चढत होती. पुणेकर खाली उतरताना आम्हाला हिंदी भाषिकांच्या स्वाधीन करून अलगद आपला हात सोडवून घेत खाली उतरले. हिंदी भाषा सिक्किमकडे घेऊन चालली. क्वचितच मराठी मंडळी भेटत होती. मग मराठीत गप्पा व्हायच्या. हिंदी भाषिक पुढच्या प्रवासातली काही माहिती पुरवत होते. गप्पांमधून आमचे कौतुक व्हायचे. आमच्या वयाची त्यावेळी जाणीव करून दिली जायची. या वयातही इतका उत्साह ? आजी पण ? दोघांचे गुडघे अजूनही शाबूत आहेत. तरुण जोडी असेल तर आम्हाला कधी असा वेळ मिळणार मजा करायला ? असे म्हटल्यावाचून रहात नव्हती. लहान मुलं असली तर दादी नानी करून चिकटायची, खेळायची. वेळ मस्त जातो गाडीत. पण आजकाल मी आपण होऊन पुढे होत नाही खेळायला. जेव्हढ्यास तेव्हढे खेळायचे. काही मुलं सोडत नाहीत. खेळ रंगला की या आवाजाने आजूबाजूची मुलं पण गोळा होतात. पाळणाघर होते मग. एका प्रवासात गंमत झाली. लमाणी बायका बस मध्ये चढल्या. मी दारातल्याच सीटवर होते. एक अगदी लहानसर आई बाळाला घेऊन चढली. मी उभी रहाण्यापेक्षा, बाळाला हातात घेणं निवडलं. पुढच्या स्टॉपला जागा मिळाल्यावर ती पोरसवदा आई पुढे जाऊन बसली. पोर माझ्या मांडीवर. शेजारच्या आजीने मला सावध केले. ए बाई, ती जाईल उतरून तर काय करशील? बापरे ! मी घाबरलेच. त्या आजीने एकेकाकडून तिला निरोप धाडला नी ते पोर तिच्या स्वाधीन केलं आणि माझी मोठ्या पेचातून सुटका केली. त्या आजींना मी धन्यवाद दिले. मग त्यांनी मला असल्या काही गोष्टी सांगितल्या. तेव्हापासून गोरे लहान मुलं दिसली की आधीच बजावतात. थोडा आठवणींचाही प्रवास

झाला. मुद्दामहून हा ही प्रवास घडवला. सावधान असा. काही वेळा लोक सामान सुद्धा असे सोडून जातात. तर, हा प्रवास आहे शेवटी.......

नूतन वर्षारंभी पहाटे ५ वाजता गाडी हावरा येथे पोहोचली. पुढे न्यू जलपैगुडी येथे जाण्यासाठी गाडी दुपारी दोन वाजता होती. वेटिंग रूममध्ये थांबून दुपारी शताब्दी एक्स्प्रेसने पुढे निघालो. रात्री ११ वाजता गाडी न्यू जलपैगुडी येथे पोहचली. न्यू जलपैगुडी पश्चिम बंगाल मधील एक महत्वाचे स्टेशन. भारतातील दार्जिलींग व सिक्किम येथे, तसेच भूतान मध्ये जाण्यासाठी न्यू जलपैगुडी येथे यावे लागते. रात्री तेथील रिटायरिंग रूममध्ये मुक्काम केला. पुढील मुक्काम लाटपंचर येथे होता. सकाळी ७ वाजता गाडी येणार होती व आमचा पुढील प्रवास सुरु होणार होता. आता पुढील सर्व प्रवास मोटारीने होता. लाटपंचर येथील हॉर्नबिल होम स्टे मध्ये आमचा मुक्काम होता. तेथे जाण्याची आमची ही ५ वी वेळ. त्यामुळे मालक पदमजी गुरुंग यांची आमची चांगलीच दोस्ती झाली. त्यांच्याशी संपर्क केला होताच, दिनांक २ रोजी सकाळी ७ वाजता गाडी न्यू जलपैगुडी स्टेशनवर येणार होती. दिलीपजी गाडी आ जायेगी आप चिंता मत करो । असे पदमजी आवर्जून सांगत. दिलीपजी, दिलीपजी बोलना मुझे अच्छा लगता है । कभी कभी मै भी बोल लेती हू दिलीपजी । लाटपंचरला जाताना आम्ही गजोलडोबा येथे पक्षी निरीक्षणासाठी जाणार होतो. जानेवारी २०१९ मध्ये आम्ही प्रथम गजोलडोबाला भेट दिली होती. आमच्यासाठी हा दिवस खूपच भारी होता. त्या वेळी इतक्या सुंदर ठिकाणी आम्ही शेवटच्या दिवशी भेट दिली होती परंतु परतणे आवश्यकच होते. त्यामुळे पुढील वर्षी हिवाळ्यात यायचे नक्की ठरवूनच आम्ही पुण्याकडे परतलो होतो. आज आमचा प्रवास गजोलडोबाच्या दिशेने सुरु झाला. बरोबर सकाळी ७ वाजता आमच्या ड्रायव्हरने आल्याची वर्दी दिली व आम्ही गजोलडोबाच्या दिशेने निघालो. न्यू जलपैगुडी ते गजोलडोबा अंतर साधारण ३० किमी. आहे. दिनांक २ जानेवारी २०२० पासून आमचे पक्षी निरिक्षण सुरु झाले व आमचे पहिले ठिकाण होते गजोलडोबा.

## पाणपक्ष्यांचे संमेलन - **गजोलडोबा**

पश्चिम बंगाल मधील गजोलडोबा - जलपैगुडी जिल्ह्यातील एक छोटेसे खेडे. येथे तीस्ता नदीवर बांधलेल्या धरणाचे पाणी अडवून शेतीसाठी कॅनॉल द्वारे पुरविले जाते. धरणाचे बॅकवॉटर व सभोवताली असलेले वैकुंठपूर फॉरेस्ट ह्यामुळे गजोलडोबा म्हणजे हिवाळ्यात स्थलांतर करणाऱ्या पाणपक्ष्यांसाठी स्वर्गच. हे पक्षी पाहण्यासाठी नोव्हेंबर ते फेब्रुवारी हाच योग्य काळ. ह्याशिवाय हिमालयातील कांचेनजुंगा रेंजची पार्श्वभूमी हे गजोलडोबाचे आणखी एक आकर्षण.




गजोलडोबा येथील मनोहारी दृश्य

गजोलडोबा येथे पक्षी पाहण्यासाठी छोट्या होडीने फिरावे लागते. पाणी फार खोल नसते. काही वेळा बोटमनला पाण्यात उतरून होडी ढकलावी लागते. आमचा बोटमन तपस मंडल ह्या बाबतीत हुशार होता. त्याला पाणपक्ष्यांची

खूपच माहिती होती व खूप दूरवरून पक्षी बरोबर ओळखता येत होते. तपसची व आमची ओळख तशी जानेवारी २०१९ मधील जेव्हा आम्ही प्रथम गजोलडोबा येथे गेलो होतो. त्याने पुण्यात काही महिने सिंहगड रोडवर एके ठिकाणी काम केले होते. त्याला पुण्याविषयी विशेष आत्मीयता होती त्यामुळे तो आम्हाला पुणेके अंकल आंटी च म्हणत होता. जवळच त्याच्या मेव्हण्याचे कॅन्टीन होते तेथे नाष्टा करून आम्ही बाहेर पडलो. पायाखाली लाल बियांचा सडा पडलेला दिसला. माझी नजर बियांवर गेली. तपस म्हणाला त्या रक्तचंदनाच्या बिया आहेत. झाडाचे निरीक्षण केले. फोटो काढले. झाडावर काही पक्षीही दिसले. पाईड मैना म्हणजे काळा पांढरा रंग असलेली पिवळसर चोचीची मैना. शिवाय साळुंक्या, चिमण्या ही दिसल्या, आपल्या कडील असतात तशाच. आपल्या कडे काळी डोकी करडा रंग असतो तशाच. पण इकडे पुढे गेल्यावर चिमण्यांचे रंग बदलतात. त्यांची डोकी काळपट लाल रंगाची असतात. त्यांचे फोटो काढून आम्ही बोटीकडे निघालो. हवा स्वच्छ असेल व स्वच्छ सूर्यप्रकाश असेल तर कांचेनजुंगा रेंजचे सुंदर दृश्य येथून दिसते. आम्ही गेलो त्यादिवशी वातावरण स्वच्छ नव्हते. त्यामुळे आम्हाला चांगला फोटो मिळाला नाही. गजोलडोबाच्या पाण्यात मुख्यतः मासेमारी चालते. त्यापैकी बरेच नावाडी नोव्हेंबर ते फेब्रुवारी महिन्यात पक्षी दाखवण्यासाठी पक्षी निरीक्षकांना घेऊन जातात. आता तपस आम्हाला एक एक पक्षी दाखवत होता व आम्ही दोघेही फोटो काढण्यात दंग झालो.

गजोलडोबा येथे लिट्ल ग्रेब, बार हेडेड गूज, ग्रे लॅग गूज, लेसर व्हिसलिंग डक, रुडी शेलडक, कॉमन शेलडक, टफटेड डक, कॉमन टिल, युरेशिअन व्हिजन, स्पॉट बिल्ड डक, मालार्ड, ग्रेट कॉर्मोरंट, इंडियन कॉर्मोरंट, लिट्ल कॉर्मोरंट, इंडियन पॉण्ड हेरॉन, ग्रे हेरॉन, पर्पल हेरॉन, नॉर्दन लॅपविंग, रिव्हर लॅपविंग, ग्रे हेडेड लॅपविंग, लिट्ल रिंगड प्लवर, मर्गेन्जर इत्यादी पाणपक्षी आढळतात. पाणपक्ष्यांचे वैशिष्ट्य म्हणजे हे पक्षी दिवसा पाणी सोडून कुठे जात नाहीत. फक्त आपल्यापासून ठराविक अंतर राखून असतात. कारण अर्थात स्वसंरक्षण. हे पक्षी मोठ्या संख्येने बघायला मिळतात. झुंडीने रहातात,

लीडर उडाला की त्याचे मागे सगळे उड्डाण करतात. त्यांना कशी चाहूल लागते? ते अंतर कसे मोजत असतील? एक ना दोन अनेक प्रश्न उपस्थित होत होते. आपापला जोडीदार त्याच्या विषयीच्या आपल्या सारख्याच भावना ते जपत असतील असे जाणवत होते. आता तो एक संशोधनाचा विषय मिळून गेला होता. होडी किती अंतरावर आणि कुठे थांबवायची की ज्यामुळे पक्षी उडून जाणार नाही व चांगला फोटो मिळेल याबाबत तपसचा अनुभव जबरदस्तच होता. पुण्यातल्या पावसाला कंटाळून आम्ही बाहेर पडलो होतो. आता तर इथे चक्क आम्हाला डोळे दिपवणारे, उब देणारे ऊन मिळाले होते. आज आम्ही अतोनात खुश होतो. थंडी होती तरी स्वेटर काढून उन्हाची उब घेतली अधाशा सारखी. किती दिवसांनी सूर्यदर्शन झाले होते.

रुडी शेल डक एक सुंदर पाणपक्षी कधीही पुढे आला की फोटोचा मोह होत होता. सहसा जोडीने फिरतात.



रुडी शेल डक

ऑरेंज रंगाचा पक्षी, त्यात ग्रेडेशन शेड, झेंडू कलर, काळी चोच, शेपटीला चोची एव्हढाच काळा रंग, हलका होत गेलेल्या केशरी रंगाचे डोके, डोळा म्हणाल तर जणू काही काचेची गोटी. किंवा बघा हं, सुई टोचली की कसा रक्ताचा थेंब गोल गरगरीत टपोरा दिसतो तसा. भारी उपमा ना ? तंतोतंत वर्णन.




रिव्हर लॅपविंग

रिव्हर लॅपविंग हाही एक सुंदर रुबाबदार पक्षी. मोहात पडावा असा. काळा साधारण पुढून पांढरा रंग, पाठीवर हलका बफ कलर किंवा बदामी कलर. काळ्या रंगानी मानेवर, गळ्यावर उठावदार वास्तव्य केलंय. त्यामुळे गुबगुबीत सौन्दर्यात भरच पडतेय. आम्हाला आवडलेल्या पैकी हा एक पक्षी. आपल्या टिटवी जातकुळीचा. टिटवी वर्गीय पक्षी आहे हा.

आणखी एक दुर्मिळ पक्षी म्हणजे नॉर्दन लॅपविंग. डोक्यावर ऐटबाज काळा तुरा असलेले हे पक्षी घोळक्याने राहतात. छातीवर काळा व पांढरा रंग, डार्क हिरवे पंख, पंखावर मध्येच लाल छटा व शरीराचे तापमान नियंत्रित करण्यासाठी एका पायावर उभे राहण्याची पद्धत. थोडेसे अंतर हे पक्षी एका पायावर आपण लंगडी घालतो त्याप्रमाणे उडया मारूनच पार करतात. हे सर्व पाहायला फारच मजा आली.




**नॉर्दन लॅपविंग**

ह्याच कुळीतला आणखी एक पक्षी म्हणजे ग्रे हेडेड लॅपविंग. नारिंगी पिववळसर चोच, त्यावर पुढे काळा ठिपका व पिवळे पाय. करड्या रंगाचे डोके, मान व छाती आणि त्याखाली अस्पष्ट काळी बॉर्डर व शेपटीवर काळा पट्टा. हे पक्षी आम्ही प्रथमच पहात होतो. पक्षी निरीक्षक त्याला लाइफर म्हणतात. आमच्या दृष्टीने आजचा दिवस खरच अविसमरणीय होता. आता चार वाजायला आले होते. आम्ही पुण्याहून निघाल्यापासून दोन दिवसांच्या प्रवासानंतर तसेच बोटीत बसलो होतो पायही अवघडले होते. आता बास बास असे होऊन गेले

होते. तपस मनापासून पक्षी दाखवत होता. माहिती देत होता. त्याने कधी कॅमेरा वापरला नाही पण पक्ष्यांचे बारकावे त्याला नावासकट माहित होते. अगदी योग्य व्यावसायिक होता तो. आग्रहाने जेऊ घातल्या सारखे आम्हाला पक्षी दाखवत होता. म्हणाला बर्डस तो देख लिये अब सनसेट भी देख लो । तो आम्हाला घरी जेवायला येण्याचा आग्रह करत होता. 'गायी वळल्या घरी सांज ये गोकुळी ' सारखी गाणी प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली. आमची अवस्था हम दोनो चित्रपटातील " अभी ना जाओ छोडकर के दिल अभी भरा नही " सारखी झाली होती. रात्रीचा मुक्काम लाटपंचरला होता. सुमारे ५० किमी. चा प्रवास होता. पुन्हा सोमवारी दि. ६ रोजी लाटपंचरहून सकाळी येण्याचे ठरविले व तपसचा निरोप घेतला. त्याने सोमवारी आम्हाला त्याच्या घरी चहाला येण्याचे आमंत्रण दिले. आमचा ड्रायव्हरही दिवसभर थांबला होता. आम्ही गाडी लाटपंचर कडे वळवली. साधारण ७ वाजता आम्ही लाटपंचरला पोहचलो.



ग्रे हेडेड लॅपविंग

तेथे आमचे स्वागत पदमजी व सुषमाजी यांनी केले. दिनांक ३ रोजी आम्ही विश्रांती घेतली. त्या दिवशी दुपारी जोरदार पाऊस पडला व तिकडील केव्हाही बदलणाऱ्या हवामानाची झलक पहायला मिळाली.

दि. ६ रोजी सकाळी लवकर बाहेर पडलो. गजोलडोबा येथे साधारण ७.३० वाजता पोहचलो. परंतु त्या दिवशी निसर्ग आमच्यावर प्रसन्न नव्हता. धुक्यामुळे १० फुटावरील सुद्धा काही दिसत नव्हते. पहिल्या दिवशी पाहिलेल्या रक्त चंदनाच्या बियांची आठवण झाली. मी म्हटले घाई करू नकोस. 'घाई करू नको' वाचताना चुकल्यासारखे वाटले ना? आजकाल सारख्या ट्रिप्स चालल्या आहेत ना, कळत न कळत जवळीक वाढली होती. मॅच्युरिटी आली वयाबरोबर. अहो-काहो वरून अरे-तुरेवर कधी गाडी सरकली ते कळलेच नाही. बऱ्याच वेळेला एकेरी उल्लेख सहजरित्या व्हायला लागला. एकदम लक्षात आले, आपण बऱ्याच वेळा असे बोलून गेलोय. अरे-कारे म्हटल्याचा राग नाही का येत ? काही बोलला नाहीस ? त्याला काय झालं ? चालतय की. माझ्या भुवया उंचावल्या गालातल्या गालात हसूही आले, मज्जा वाटली. बरोबर मित्र मंडळी असतात बऱ्याच वेळा त्यांच्यात अरे-तुरे चालते. त्यामुळे आमच्यात सुद्धा घरा बाहेर पडले की होते. बाहेरच्या मोकळ्या वातावरणाचा परिणाम बाकी काही नाही. घरी आले की अहोला सुरवात. सुमारे ३ तास इकडे तिकडे वेळ काढला व १०.३० च्या पुढे बोटीत बसलो.

बोट एका छोट्याशा बेटाजवळ गेली. त्याला तपस जंगल म्हणायचा, जंगल देखो । बोलला की मी दूरवरच्या झाडात शोधाशोध करायची. मला काही दिसायचेच नाही. गोरे म्हणाले 'अगं जंगल म्हणजे समोरचे उंच गवत'. पाण्यात अशी छोटीछोटी जंगलं बरीच होती. त्यात उंच उंच गवत होते. पक्षी विसाव्याला तेथे जात. घरटी व अंडी घालण्याची सुरक्षित जागा. मोठ्या गवताचे प्रतिबिंब पाण्याच्या प्रवाहात हलायचे. बोटीमुळे पाण्यात उठलेले तरंग प्रतिबिंबाला खेळवत होतं. वर गवत वाऱ्यावर झुलत होते. माझे मन त्यात इतके रमले की मी शूट करायलाच विसरून गेले. मग तपसला सांगून ठेवले.

आगे बहोत सारे जंगल मिलेंगे । वहा शूट कर लो । ठीक है । त्याने तर एकदम जंगलांचे जंगलच शोधून काढले. दोन जंगलांच्या मधून जाताना गवताची मोठी पाती आम्हाला टप्पल मारत होती. तर त्यातले किडेमकोडे आमच्या अंगाखांद्यावर येत होते. त्यांच्या पासून सावध राहताना 'कॅमेरा सांभाळ ग' सूचना यायची. एकदम अरुंद वाट, जेम तेम बोट जाऊ शकेल इतकीच, खरं तर 'बोट वाट'. भीतीही वाटायची, पुढे त्याने एका मस्त जागेवर बोट थांबवली. आम्ही शूट केले. वारा, पाणी, तरंग त्यावर नाचणारे गवताचे प्रतिबिंब. गवतावर बसलेल्या चतुरांचे पण प्रतिबिंब टिपायला कॅमेरा विसरला




गवताची पाती ग्रुप डान्स

नाही. आम्ही कसेबसे जीव रमवत होतो. कारण आज अजून स्वच्छ सूर्यप्रकाश नव्हता. पक्षीही अंतर ठेवूनच पोहत होते. पाण्यात मोठमोठी कमळाची पानं पंगत मांडल्या सारखी वाटत होती. इतका वेळ गेला की पुन्हा भुका लागायची वेळ आली. गोळी खा, बिस्कीट खा, पाणी पी आणि अनावश्यक क्लिक कर. असे चालले होते. पक्षांचे फोटो काढताना आपला सब्जेक्ट (ज्याचा फोटो

काढायचा तो) व त्यावर पडणारा प्रकाश यापैकी आपल्या हातात काहीच नसते. आपल्या हातात फक्त वाट पहाणे असते. ही पण एक प्रकारची साधनाच असते. गवताची एखादी काडी लवून पाण्यात हात घालत होती. जशा कथकच्या मुली स्टेज वर शो चा शेवट करतात तशी मधे मधे दृश्य दिसली, त्यांचे फोटो काढले. गवताची पाती ग्रुपडान्स करताना दिसत होती. हिरवी पाती आणि प्रतिबिंब काळी. सुंदर फ्री हँड डिझाईन पण तयार होत होते.

आज पुन्हा मागील सर्व पक्ष्यांची उजळणी झाली. बरेच डक्स बघितले. त्यामध्ये युरेशियन व्हिजन, मालार्ड, नॉर्दन शॉवेलर, रेड क्रेस्टेड पोचार्ड, युरेशियन कूट, कॉमन शेलडक, कॉमन टील, टफ्टेड डक इत्यादी. बरेच पक्षी आमची बोट त्यांच्या जवळ आली की दूर उडून जात. परंतु जाताना ते काही अंतर पाण्यावरून पळत जात व नंतर विमानासारखा टेक ऑफ घेत.



रेड क्रेस्टेड पोचार्ड

**बऱ्याच वेळेला आमच्या बोटीच्या वरून उडत जाताना त्यांच्या पंखावरील पाण्याचे तुषार आमच्या अंगावर पडून शहारे येत. पक्ष्यांचा टेक ऑफ बघताना व त्यांचे फोटो घेताना फारच मजा आली. मधून मधून सूर्यप्रकाश कमी जास्त होत होता. एकदा तर पावसाची शक्यता वाटत होती.**

**आजचा दिवस वाया जाणारसे वाटू लागले. चहाची वेळ झाली होती ...... आणि एकदम चमत्कार झाला. कमलदलाच्या आडोश्यातून सूर्याचे हलके प्रतिबिंब डोकावले आणि आम्ही एकदम अलर्ट झालो. चला आता दोन अडीच तास जरी मिळाले तरी आजचा दिवस सफल झाला. आता आम्ही बेट म्हणजे जंगल सोडून पुढे आलो. घड्याळ अडीचच्या पुढे सरकले आणि सूर्य पण वर चढत होता. पक्ष्यांच्या मध्ये उत्साह संचारला, आम्हीही सरसावलो. तपसची तपस्या अब रंग लायेगी । ऐसा कुछ कुछ दिखाई देने लगा । हम बर्डस के पीछे जायेंगे । मर्गेन्जर मिल सकता है । मेल फिमेल दोनो है । और भी बोट आ जायेंगे शायद । त्याला बोटीत उभे राहून दूरचे दिसत होते.**



**मर्गेन्जर ची जोडी**

त्याचा अंदाज खरा ठरला. ब्राऊन डोक्याची मादी व काळ्या डोक्याचा नर, बाकी पक्षी पांढराच. आधी इकडे तिकडे दोघे जण दिसले. तसा छोटासाच आणि खूप दूरवर. नुसता काळा ठिपका. माझ्या लक्षात आला. गोरेंना जेव्हा मराठीत पत्ता सांगितला तेव्हा त्यांना पण सापडला. आता ऊन चांगलेच पडले होते. लॉटरी लागली, लाइफर पण मिळाला. आम्ही भराभर पुढे सरकलो, नंतर इकडे तिकडे एक एक दिसायला लागले. तपस म्हणाला दो जोडा । जसे आम्ही पुढे गेलो तसे ते अधिक स्पष्ट दिसू लागले. कॅमेऱ्याच्या टप्प्यात आले. खटाखट क्लिकिंग सुरु झाले. आणखी चार होड्या आल्या सगळ्यांनी मिळून घेराव घातल्या सारखे झाले. त्यामुळे ते ही चौघे एकत्र आले. अलभ्य लाभ होता. एका फ्रेम मध्ये दोन जोड्या. एव्हाना बाकीच्या बोटी मागे फिरल्या होत्या. का ते कळलेच नाही. पण आमच्या दृष्टीने सुवर्ण संधी. चक्क आम्ही स्टेज शोच तर बघत होतो. अप्रतिम दृश्य मिळाली. खेळणं, बागडणं, भांडणं सगळं सगळं. माझे एकदम खाली लक्ष गेले. बोटी खालची वाळू उधळली होती. मला पहिल्यांदा वाटलं की धूळ उडते तशी बोटीचे वल्हे फिरल्यामुळे वाळू वरवर येत असेल पण तो काहीतरी निराळाच प्रकार असावा. अजूनही आठवण झाली की अंगावर काटा येतोय माझ्या. इतक्यात मर्गेन्जर जोडीची झकापक सुरु झाली त्यांना मासा सापडला होता. काही वेळ माशासाठी भांडण करून उरलेला तुकडा घेऊन एक जण उडाला तसे सगळेच पसार झाले.

चार वाजले होते. आम्ही मागे फिरलो. फिरताना तपस म्हणाला, यहाँ गणेशजी आते है । मतलब ? पानी पिने के लिये हाथी आ सकता है । समोरच्या किनाऱ्यावर साधारण ४० - ४५ म्हशी तिन्हीसांजेला परतल्या होत्या. अख्खी काळी भिंत चरत चरत चाललीय असे दृश्य होते. मी विचारले, ये सब पानी मे उतरने वाले है क्या ? नही नही ये तो घर जा रहे है । मी हुश्श केले. आता साडेचार वाजायला आले होते. सगळे पक्षी एकत्र जमले होते. प्रत्येक पक्ष्यांच्या झुंडीच्या झुंडी एकत्र जमल्या होत्या. होते पक्षीच पण अक्षरशः मासळीबाजार भरला होता जसा काही. तिन्हीसांजेची सगळी लक्षणं उजागर व्हायला लागली होती. सांज ये गोकुळी गाणं सजीव चित्राप्रमाणे आमच्या डोळ्यासमोर जसच्या तस रेखाटलं होतं. निःशब्द

झालो. संध्याकाळच्या सूर्यप्रकाशात (गोल्डन लाईट) फोटोग्राफीची एक निराळीच झलक मिळते. तपस आम्हाला पुन्हा पुन्हा काही काही दाखवत होता व आम्ही फोटो काढत होतो. इतक्यात पुन्हा ब्लॅक नेक्ड ग्रेब दिसला. उंच मानेचा पांढरा पक्षी, थोडीशी ब्राउन व काळपट शेड मानेवर. त्याच्या मनात आले की, धोका वाटला तर, मासा दिसला तर एकदम खाली सूर मारतो व लांब कुठून तरी बाहेर येतो. आत्ता तो निवांत पोहत होता. पाठमोरा पुढे सरकत होता आणि पाठीमागे पाणी फेसाळत त्याच्या मागून जात होते. जसा काही त्याचा पिसाराच आहे. आजच्या श्रमाचे सार्थक झाले. शेवटी बोट किनाऱ्याला लागली. आम्ही तपसच्या मदतीने खाली उतरलो. आधी पाच मिनिटे पायरीवर बसलो. पाण्याची गती आली होती ना! सकाळी १०.३० वाजल्यापासून बोटीत बसलो होतो.



ब्लॅक नेक्ड ग्रेब

गजोलडोबाने आम्हाला खूप काही दिले. पक्ष्यांच्या मधील प्रेमी जोड्या बघितल्या. सगळं आपल्या सारखेच. दु:ख, वेदना, भीती, राग, प्रेम, माया,

ममता सगळं दृष्टीने टिपत व आमच्या मर्यादा सांभाळून फोटो काढताना दिवस कसा गेला ते कळलेच नाही.

होडीतून उतरल्यावर तपस आम्हाला त्याचे घरी घेऊन गेला. घरातील मंडळींशी आमची ओळख करून दिली. एक नवीन पदार्थ त्याचेकडे खायला मिळाला.



कॉमन शेल डक

तांदुळाच्या घावनामध्ये मोदकाचे सारण. बटाट्याच्या भाजी ऐवजी. खरच खूप मस्त चव होती. ओल्या नारळाच्या उकडीच्या करंज्या काजूबीजू सुकामेवा घालून आग्रहाने खाऊ घातल्या. पार्सल पॅक बरोबर दिले. त्याच्या वडिलांनी उसाची एक मोळी बांधून आमच्या गाडीत आधीच आणून ठेवली. त्याची आई, वडील, पत्नी टाटा करायला वर पर्यंत आले आणि आम्ही दिसेनासे होई पर्यंत हात हलवत होते. खरच जग सुंदर आहे. त्यातले सौन्दर्य वेचता येणं महत्वाचे. माझे पुस्तक वाचन खूप खूप कमी आहे. पण मी मला स्वतःला, माझ्या

शरीरातील सर्व गोष्टी, माझी माणसं, आजूबाजूची माणसं, गाव, प्राणी, पक्षी वाचत असते. तुम्ही पण वाचून बघा. मजा असते या वाचनात. मला आवडतं असं निराळं काही तरी. त्यातली सूक्ष्मता लक्षात येते. कार्य कारण भाव समजायला लागतात. घटना परिस्थिती हाताळणे सोपे होते.




बाय बाय गजोलडोबा

गजोलडोबाचा निरोप घेऊन आम्ही लाटपंचर कडे निघालो. लाटपंचरला पोहचायला आठ वाजून गेले होते. पदमजीके फोन आने लगे थे । देर हो रही थी। सब लोग राह देख रहे थे । अच्छा लगा । आम्हाला भेटून गाईड उद्याचा कार्यक्रम ठरवून घरी गेला. आम्हीही जेऊन खाऊन लवकरच झोपलो. उद्या लवकर बाहेर पडायचे होते.

## सिंकोना वृक्षांच्या परिसरात - लाटपंचर

लाटपंचर - पश्चिम बंगाल मधील दार्जिलिंग जिल्ह्यातील एक छोटेसे खेडेगाव. महानंदा वाईल्डलाईफ सँक्चुअरी मध्ये येणारे छोटेसे निसर्गरम्य ठिकाण. समुद्रसपाटीपासून उंची साधारण ४५०० फूट. अत्यंत सुंदर व टुमदार घरे, घरांची सजावट, रंगीत पडदे, घराभोवती शोभेच्या फुलांच्या असंख्य कुंड्या, आणि रस्त्याच्या कडेला फुललेली गुलाबाची रोपे. अपरिचिताचे सुद्धा हसून स्वागत करणारे नेपाळी लोक. सँक्चुअरी मध्ये असल्यामुळे केव्हातरी होणारे जंगली प्राण्यांचे दर्शन. डोंगर उतारावरील चहाचे मळे. सर्वत्र असलेली नीरव शांतता आणि हिमालयाचे दर्शन. कोणत्याही निसर्गवेड्या माणसाला आकर्षण वाटावे असे खेडे आणि अर्थातच पक्षी निरीक्षकांची पंढरी. गजोलडोबाचे पाणपक्षी होते परंतु आता आम्ही ४५०० फूट उंचीवर होतो. येथे आढळणाऱ्या पक्षी प्रजाती वेगळ्या. त्यामध्ये यूहीना, स्केली थ्रश, वूडपेकर्स, ब्लॅक बुलबुल्स, मॅग पाईज, मिनिव्हेट, मिनला, ड्रोनगो, किंगफिशर्स, रॉबिन्स इत्यादी. येथील स्टार पक्षी म्हणजे रुफस नेक्ड हॉर्नबिल. हा पक्षी पाहण्यासाठी येथे भारतातूनच नाही तर परदेशातून मंडळी येतात. कारण हा पक्षी येथे हमखास दिसतोच. येथे राहण्यासाठी लॉजेस नाहीत परंतु काही होम स्टे आहेत. तेथे उत्तम सोय होते. या छोट्याशा गावात ७-८ होम स्टे ज आहेत. एका पक्ष्यामुळे ह्या छोट्या गावाला खूपच प्रसिद्धी मिळाली व कित्येकांना रोजगारही मिळाला. या शिवाय येथे सिंकोना (मलेरिया वरील औषध) प्लांटेशन, अहल दारा व्ह्यू पॉईंट जेथून कांचेनजुंगा दिसते, सिंकोना व पाईन ट्रीजने वेढलेले नामथींग लेक त्यात दिसणारे हिमालयन सॅलॅमँडर, ऑरेंज गार्डन्स इत्यादी ठिकाणे प्रसिद्ध आहेत. रस्ते खडबडीत असल्यामुळे येथे जीपने प्रवास करावा लागतो.

आम्ही रहात असलेला होम स्टे म्हणजे हॉर्नबिल होम स्टे. हॉर्नबिल होम स्टे चे मालक श्री. पदमजी गुरुंग व सुषमाजी गुरुंग. या उभयतांनी आम्हाला आता दादा-दादीच केले होते. पदमजी टुरिस्टची सर्व व्यवस्था बघत व सुषमाजी

दोन सहकाऱ्यांच्या साहृयाने स्वयंपाकघर सांभाळीत. मी त्यांना थोडेफार मराठी पण शिकवले होते. येताना आपलं मिरची लोणचे पण करून दाखविले.



हॉर्नबिल होम स्टे

हॉर्नबिल होम स्टे, लाटपंचर, तर आता आमचं घरच झालंय असं म्हणायला हरकत नाही. इथे आम्ही आम्हाला हवं ते शिजवून खात होतो. येथे भाजीपाला जवळजवळ मिळत नाही. सर्व सामान सिलिगुडीहून (अंदाजे ५० किमी.) आणावे लागते. त्यामुळे दिवसभरात बटाटा, आलू व पोटॅटो अशाच भाज्या असतात. मुख्यतः दाल, चावल हेच खाणे. या वेळेला आम्हाला एक नवीन गाईड मिळाला संजय त्याचे नाव. एक पक्षी आम्हाला पाहायचाच होता व तो त्याने दोन दिवस बरीच मेहनत घेऊन दाखवलाच. त्यासाठी आम्ही एका विशिष्ट ठिकाणी लागोपाठ दोन दिवस गेलो होतो. एखादा पक्षी त्या विशिष्ट हंगामात दिसतो किंवा नाही किंवा तो कोठे दिसतो, त्याच्या काही विशिष्ट सवयी, तो कोणत्या फळझाडांवर किंवा फुलझाडांवर दिसतो, तो कोणत्या इतर पक्षांच्या बरोबर दिसतो, त्याचा विशिष्ट आवाज, हया सर्व गोष्टींची माहिती

**एका उत्तम बर्ड गाईडला असावी लागते. अर्थात हे सर्व अनुभवानेच येते. पदमजींनी अशी बरीच मुले तयार केली आहेत व त्यांना बर्ड गाईड म्हणून रोजगाराची संधीही दिली आहे.**



**रुफस नेक्ड हॉर्नबिल**

**दि. ४ व ५ जाने. रोजी आम्ही संजय गाईड सह सकाळी ७ वाजताच बाहेर पडलो. लाटपंचर वरून अहल दारा व शिवखोला मार्गे एक रस्ता रंगटांग कडे जातो. रंगटांग हे सिलिगुडी-दार्जिलिंग छोट्या रेल्वे लाईन वरील एक टुमदार स्टेशन. तेथे नाष्टा करून आम्ही रस्त्याने पुढे निघालो. ह्या रस्त्याच्या कडेने ही छोटी रेल्वे धावते, हा रस्ता दार्जिलिंग पर्यंत जातो. ह्या रस्त्यावर कुर्सेऑंग नावाचे एक स्टेशन आहे. त्या पुढील भागास पगला जोरा असे म्हणतात. ही छोटी रेल्वे रस्त्याच्या कडेने धावते. तिला आम्ही दोन वेळा पाहीली. हीचे रूळ कुठून कुठे कसे काढले होते ते बघून मज्जा वाटत होती. बाजूच्या गावातील अंगणातून रूळ जात होते, मुलं त्यावर खेळत होती, कोंबड्या आपल्या पिलांसह रुळावरून फिरत होत्या. कुत्री होतीच. म्हातारी माणसं निवांत ऊन खात रुळावर बसली होती.**

आपण नेहमीच रस्ते क्रॉस करतो किंवा रेल्वेरूळ क्रॉस करतो. पण आज येथे चक्क रेल्वे गाडी रस्ता क्रॉस करताना आम्ही कित्येक वेळा बघितली. रूळ कधी डावीकडे दिसायचा तर पुढे क्रॉस करून उजवीकडून खाली उतरून परत डावीकडे दिसायचा. आम्ही जीप मध्ये होतो. रस्त्याच्या दोन्ही बाजूला घनदाट झाडी व तेथे आमचे पक्षी निरीक्षण.



रस्ता क्रॉस करतांना दार्जिलिंग हिल रेल्वे

हीच ती दार्जिलिंग हिल रेल्वे. हीला लोक टॉय ट्रेन असे गमतीने म्हणतात. ही दोन डब्याचीच असते. अळी सारखी वाटली. कारण एक तर ती लहानशी आहे, रस्त्याच्या कडेकडेने चालते. आतले प्रवासी आम्हाला हात हलवून टाटा करत होते. त्यांची खुशी जाहीर होत होती. आम्हीही हात हलवून ट्रेन दिसल्याचा आनंद व्यक्त करत होतो. सिलिगुडी ते दार्जिलिंग ह्या मार्गावर ही ट्रेन धावते. सिलिगुडी पासून (५०० फूट ) ते दार्जिलिंग पर्यंत (७२०० फूट) इतक्या उंचीवर ही ट्रेन धावते. युनेस्कोच्या वर्ल्ड हेरिटेज लिस्ट मध्ये ही ट्रेन आहे.

संजयने मेहनत करून दाखविलेला पक्षी म्हणजे सुलतान टिट. साधारण चिमणीच्या आकाराचा काळा पिवळा पक्षी. काळी पाठ, काळा गळा, पिवळे पोट व डोक्यावर ऐटदार पिवळा तुरा. असा एखादा लाईफर बघितला की त्यासाठी केलेली सारी धावपळ कारणी लागल्यासारखी वाटते. संजयच्या निरीक्षणानुसार सुलतान टिट




सुलतान टिट

हा मिनिव्हेट नावाच्या पक्ष्यांच्या घोळक्यात दिसू शकतो आणि तसा तो मिनिव्हेटच्या घोळक्यात बरोबर सापडला.

दुसऱ्या दिवशी लवकरच बाहेर पडायचे ठरविले. सकाळी सर्व आटोपून खाली आलो. तीस्ता नदीच्या विशाल पात्रावर सूर्य किरणं पोचली होती. मध्येच ढगांनी किरण अडवून सुंदर नक्षी तयार केली होती. आकाशाचे रंग जलद गतीने बदलत होते. क्षणाक्षणाला चित्रकाराचे विचार बदलत होते. तसे आकाशातले चित्रही बदलून जायचे. जरा उजाडले तसे आम्ही खाली उतरलो. खाली फुलांची बाग होती.

गाडी येण्याची आम्ही वाट पहात होतो. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला लाल फुलांची झाडं होती. त्यावर बुलबुल, सनबर्ड, स्पायडर हंटर फुलातील मधुरसाचा ब्रेकफास्ट घेत होते. फोटोग्राफीसाठी उत्तम संधी ! याच प्रकारच्या फुलांवर थोडेसे पुढे गेल्यावर ऑरेंज बेलिड लीफ बर्ड मिळाला.



स्ट्रीकड स्पायडर हंटर

गाडी आली व आम्ही पुढे निघालो. वाटेत पक्षी बघत जात होतो. रंगटांगला जाण्यापूर्वी शिवखोला नावाची एक जागा आहे. तेथे एक शिव मंदिर आहे. बाजूला नदी पात्र आहे. संजय म्हणाला, दिलीप सर नदीमे देखो. नदीत मुंगुसासारखा एक प्राणी उड्या मारीत होता. त्याचे नाव येलो थ्रोटेड मार्टेन. त्याचे फोटो आणि व्हिडीओ घेतले. आज पुन्हा कालच्या रस्त्यानेच जायचे ठरविले होते. रंगटांग येथे नाष्टा केला. दार्जिलिंगच्या रस्त्याने पुढे निघालो. आज ब्लू बीअर्डेड बी इटर, एशीअन बार्ड आऊलेट, मिनिवेट, ब्लॅक क्रेस्टेड बुलबुल, स्ट्राऐटेड लाफिंग थ्रश, रस्टी चीक्ड सिमीटर बॅब्लर इत्यादी पक्षी बघितले.




**ऑरेंज बेलिड लीफबर्ड**

**आज आम्हाला स्वच्छ आकाश, हवामान आणि प्रकाश मिळाला. आम्ही खुश होतो. एके ठिकाणी गाडी थांबवून रस्त्याने पायी चालत होतो व दोन्ही बाजूला पक्षी पाहत होतो. रस्ते चढ उताराचेच होते. आमचे आपोआपच रस्त्यावर फिरणे होत होते. गोरे संजय बरोबर पुढे जायचे, मी मागे राहिले की मग त्यांच्यामागे पळत जायचे . पोचे पर्यंत धाप लागायची आणि मी जोरजोरात श्वास घ्यायची. फ्रेश हवा मला आनंद देत होती. माझं लक्ष त्या आनंदाने वेधून घेतले. कॅमेऱ्याची अजून दोस्ती होत होती. बरेच फोटो वाया जायचे. घरी आल्यावर फोटो डिलीट करण्याचे काम असायचे. संजय एक उत्तम गाईड होता. त्याचे व आमचे छान ट्युनिंग जमले होते. त्याने बरेच पक्षी दाखविले. संध्याकाळ होईपर्यंत आम्ही पक्षी बघत फिरलो.**



येलो थ्रोटेड मार्टेन

या दोन दिवसांच्या काळात सगळेच पक्षी घोळक्याने, असंख्य संख्येत बघायला मिळाले. एकजुटीने एकत्र वावरत होते. छोटे पक्षी तर स्प्रे मारल्या सारखे यायचे आणि सुगंधासारखे विरूनही जायचे. कोण होते, कसे होते काही म्हणजे काही कळत नव्हते. फक्त माझा मला खूप काही तरी बघायला मिळाल्याचा आनंद शिल्लक राहायचा. मी आनंद समेटून कॅमेरा बंद करून गाडीत बसत होते. बारके बारके तर खूप प्रकार बघायला मिळाले.

दोन्ही दिवस सकाळची कोवळी केशरी उन्ह खाली पसरलेल्या विस्तृत तीस्ता नदी पात्राची, नागमोडी जलप्रवाहाची शोभा वाढवीत होते. आम्हाला कॅमेरा हातात उचलायला भाग पडत होते. नदीतले प्रवाह केशरी रंग लेऊन सूर्याला शोषून घेत होते. म्हणूनच की काय पाण्याला इतके रंग मिळत असावेत. पाणी+प्रकाश = रंग. माणसाची आणि रंगांची प्रथम भेट अशीच पडली असेल ना? पुढे रंगांच्या शोधाची सुरवात अशीच तर झाली असेल काय ? शोध असाच लागला असावा का? विचार चक्र सुरु झाले. रंगाचे वाचन - झाड हिरवंच असत, खोड ब्राउन असतं, हे

**सगळे बदलत होते. निसर्गात सगळ्या अतर्क्य गोष्टी पहायला मिळाल्या. कधी कशाला कुठलंच बंधन नाही, नियम नाही, पाना फुलांचे असंख्य रंग, आकार, प्रकार डोळ्यांनी बघितले आणि मन स्तिमित झाले. आम्ही फक्त आ वासून डोळे विस्फारून बघत होतो आणि त्या निर्मात्या विषयी कृतज्ञ होत होतो ....... बापरे बाप !**

**पुढील दिवस ( दि. ६ जाने.) आम्ही गजोलडोबा साठी ठेवला होता. त्यामुळे संजय व ड्रायव्हरने आमचा निरोप घेतला. अगली बार आपही हमारे साथ रहेंगे। आप हमे अच्छे लगे। हस्तांदोलन करून आम्ही आमच्या खोलीत गेलो. दि. ६ रोजी गजोलडोबा करून आल्यावर आम्ही दि. सात रोजी सकाळी पुढे जाणार होतो. आतापर्यन्त आम्ही पश्चिम बंगाल मध्ये होतो. आता सिक्किम मध्ये प्रवेश करणार . पहिला मुक्काम होता केवजिंग. (साऊथ सिक्किम)**

**लाटपंचरच्या होम स्टेची मालकीण नटून थटून कॅमेरा घेऊन तयार झाली. आणि एकदम पुढे आली, आनंद ओसंडत होता. तिला आमच्या बरोबर केवर्जीगला यायचे होते. आमच्या केवर्जीग येथील मुक्कामाचे मालक तिच्या ओळखीचे होते. ती स्वतः आम्हाला पुढच्या मुक्कामी सोडायला आली. रोजच्या टुरिस्टच्या गर्दीतून एक दिवस तिला सुट्टी मिळाली. मी तिला म्हणाले सुषमाजी आज आप दिल खोलके कोई गाना गा लो हमारे लिये। बस तिचा चेहरा बदलला, उन्होने दादाजी की तरफ देखा । मै बोली गा लो कुछ मत सोचो। आज का दिन जी भर के जी लो, काम तो हर रोज है। तिने सुरु केले इतनी शक्ती हमे दे ना दाता मनका विश्वास ...... पक्षी बघत , फोटो काढत व गाणी म्हणत आम्ही सुमारे चार तासांनी केवजिंग येथे पोचलो. पश्चिम बंगाल मधून आम्ही सिक्किम मध्ये प्रवेश केला होता. आता नवीन जागेची उत्सुकता मनात दाटून आली होती. आज ७ तारीख चार दिवस रहायचे ठरले. चहा पाणी झाले, अर्ध्या तासात जेवणं उरकली. आमच्या सोबत, जीनची पॅन्ट घालून , स्वतःच्या नवीन कारमधून , मोठा कॅमेरा घेऊन, हवे त्या पोझमध्ये फोटो काढून, जी भरके गाना गा कर मन भरून एका नवीन उमेदीने खूप काही मिळवल्याचा आनंद समेटून सुषमाजी परतल्या. अगदी दिसेनाशी होई पर्यंत हात हलवत राहिल्या.**

## बुद्धाचा वरदहस्त - केवजिंग

आल्या आल्या चहा आणि मुरमुरे पुढ्यात आले. चहा म्हणजे नुसतं गरम रंगीत पाणी, साखर व दूध निराळं आणि मोठा कप आपले चार चहा होतील एवढा मोठा. अर्थात तेथील थंडीला हे आवश्यकच होते. येथे चहात मुरमुरे घालून खातात, हा त्यांचा नेहमीचा रिवाज. आपण चहा पोळी खातो त्यातलाच प्रकार. शिवांग बोनपो हे या होम स्टेचे मालक. हे तिथले प्रसिद्ध पक्षीप्रेमी. त्यांचे बर्डस ऑफ  सिक्किम हे पुस्तक प्रसिद्ध आहे.



बॉन फार्म हाऊस

बोनपो ही त्यांची जमात. ते म्हणाले अब मैं फोटोग्राफी नही करता । कॅमेरा बेच दिया । एक टाइम था, कॅमेरे के सिवा कुछ नही था । अब बस । दो चार लडके तय्यार कर दिये है । उनको भेज देता हूं । एक छोटा मुलगा तिथे आमच्या भोवती वावरत होता. खूप हुशार होता परंतु अनेक प्रकारचे प्रश्न विचारून आम्हाला भंडावून सोडत होता. मी शिवांगला विचारले ये लडका

आपका हैं । नही मैने गोद लिया हैं । खाना पीना और पढाईका खर्चा मैं करता हू । उसकी माँ मेरे यहा काम करती हैं । और इधर ही रहती हैं । बोनपा ने एक गाईड बरोबर दिला, म्हणाला अब इनके साथ एक ट्रेल करके ४ बजे तक वापस आना । कल हम साथ जाएंगे । आम्ही एक फेरी मारून आलो. एका झाडावर बरीच लगबग वाटली, म्हणून थांबलो. उंच दाट झाडी त्यात नुसता वावर दिसला पण फोटो नाही मिळाले. वाटेत रंगीत फुले दिसली. त्यावर कॅमेऱ्याचा सराव चालू केला. फोटो पेक्षा व्हिडीओच काढणे मी पसंत करू लागले. फोटो पेक्षा व्हिडीओचा आनंद वेगळाच असतो. रूम हिटर घेऊन छोटा मुलगा वरती आला. त्याची आई आमचे जेवण खाण बघत होती. थोड्या वेळात जेवण तयार झाले. खाली गेलो. टेबल तयार होते. तिने पहिले वाढून ती बाजूला उभी राहिली. कुडकुडत होती. बहोत ठंड हैं दादी क्या करे ? आम्ही जेवणाचे कौतुक करून वर आलो.

उद्या साठी कॅमेरा सज्ज करून रात्री ८ वाजताच झोपायचा दिनक्रम अंगवळणी पडला होता. पहाटे साधारण ५ वाजताच जाग आली. सवयीने खिडकी बाहेर पाहिले, चंद्र चांदण्यांच्या मंद प्रकाशात बर्फाची डोंगर रांग विलोभनीय दिसत होती. माउंट नरसिंगाचे अनपेक्षित दर्शन. जसे साताऱ्यातले डोंगर जवळ वाटतात त्याच्या पेक्षा सुद्धा जवळ वाटले. बाहेर थंडी मी म्हणत होती. हात आणि कॅमेरा दोन्ही काम करत नव्हते. क्षणाक्षणाला आकाशाचे रूप बदलत होते. गोरे उठून कॅमेरा घेऊन पोचले आणि चंद्र अस्ताला निघाला. माझ्या पहिल्या फोटोत पूर्ण केशरी चंद्र होता. चंद्राच्या पृष्ठभागावर काही वेगवेगळे आकार दिसत होते. चंद्र डोंगराआड जातोय असे लक्षात आले. भराभर फोटो काढत बसले. सूर्य जसा डोंगराआड नाहीसा होतो तसा चंद्र नाहीसा होईपर्यंत मी फोटो काढत राहिले. शेवटी केशरी चंद्र पांढरा दिसू लागला. सुरवातीला कळेनाच पण इकडून सूर्य बाहेर पडत होता. त्याच्या कोवळ्या केशरी रंगांनी चंद्र केशरी दिसत होता. अविस्मरणिय देखावा.



माउंट नरसिंगा

सकाळी सर्व आवरून तयार होतो. थंडी जोरदार होती परंतु स्वच्छ ऊन पडले होते. आमच्या रूममधून दूरवर एक बुद्धाची मूर्ती दिसत होती. त्यावर प्रकाशझोत टाकला होता. तो भाग होता रवांगलाचा. केवर्जींग पासून सुमारे १० किमी. दूर. गाडी आली, आम्ही रवांगलाच्या दिशेने निघालो. रवांगला एक टुरिस्ट स्पॉट. समुद्रसपाटीपासून उंची सुमारे ८००० फूट. तेथील बुध्दा पार्क अतिशय सुंदर आहे. रस्त्यावर काही टुरिस्ट सुद्धा दिसत होते. काळे पांढरे ढग, मधेच दिसणारे निळे आकाश मागे बर्फाचे डोंगर या पार्श्व् भूमीवर डार्क ब्राऊन वस्त्रातली बुद्धाची भव्य सोनेरी मूर्ती अतिशय सुंदर दिसत होती. याशिवाय अवती भवती हिरव्या डोंगराची सजावट तर होतीच होती.




बुद्धा पार्क, रवांगला

रवांगलाच्या रस्त्यावर माईनॲम वाईल्डलाईफ सॅंक्चुअरी आहे. तेथे जाण्याचे ठरविले होते. परंतु शिवांगच्या सांगण्यावरून तेथे खूप वर चढायला लागते. जे आम्हाला शक्य नव्हते. त्यामुळे आम्ही तेथे न जाता मुख्य रस्त्याच्या बाजूने पक्षी बघत फिरलो. रस्त्याच्या दोन्ही बाजूस असलेल्या जंगलात फारच छान पक्षी पहायला मिळाले. फायर टेल्ड मैझोर्निस हा पक्षी आमच्या दृष्टीने लाइफर होता. तो पक्षी आम्हाला आमच्या गाईडने दाखविला. चिमणीएवढा पक्षी - हिरवा, काळा, पांढरा रंग व लाल रंगाची शेपूट. त्याशिवाय फायर टेल्ड सनबर्ड, येलो चिक टिट, ग्रीन बॅक टिट, ग्रे ट्री पाय, हिमालयन ब्लु टेल इतर बरेच काही. आम्ही साधारण १० वाजता परत आलो. नाष्टा करून व दुपारचे जेवण झाल्यावर परत बाहेर जाण्याचे ठरविले.

दुपारी परत बाहेर पडलो. साधारण ४ किमी. अंतरावर एक मॉनेस्ट्री आहे. तेथे आम्ही जाण्याचे ठरविले. एके ठिकाणी गाडी थांबवून आम्ही गाईड सह

पक्षी बघत फिरत होतो. दुपारी ग्रे ट्री पाय, ग्रीन मॅग पाय, ट्री क्रीपर, ग्रे वॅग टेल, लेओथ्रिक्स, माउंटन बुलबुल, बार्ड कक्कू डव, फुलवेट्टा इत्यादी पक्षी




फायर टेल्ड मैझोर्निस

दिसले. संध्याकाळी ५ वाजता परतलो. हवामानाची काहीच खात्री नसल्यामुळे "गेला दिस नाही येत, काही करावे संचित, साधा आपुला रे हीत" ह्या ओळीप्रमाणे उद्यापासून आम्ही सकाळी बाहेर पडल्यावर एकदम संध्याकाळीच घरी यायचे ठरविले. नाष्टा व जेवण बाहेरच करायचे. त्यामध्ये वेळ वाचविणे व ज्या दिवशी सूर्यप्रकाश चांगला असेल त्या दिवशीचा जास्तीत जास्त वेळ वापरणे हा उद्देश होता. आमच्या गाईडचे नाव होते उर्जेन. छोटासा दिसत होता, पण बराच अनुभवी होता. बॉटनीची डिग्री घेतली होती. त्यामुळे कुठली झाडे कधी फळं फुलं धरतात, कोणत्या फुलांना कोणते पक्षी येतात हे सगळे त्याला माहित होते. कोणता पक्षी कोणत्या जागेवर हे त्याला पक्के माहित असायचे. आज आम्ही यक्सोम, पेलिंग (पश्चिम सिक्किम) येथे जाण्याचे ठरविले होते. आम्ही दिवसभर फिरलो परंतु आज स्वच्छ सूर्यप्रकाश नव्हता. त्यामुळे पक्षी

दिसले तरी फोटो चांगले येत नव्हते. यक्सोम ही सिक्किमची पूर्वीची राजधानी. कांचेनजुंगा पर्वतावर जाण्यासाठी गिर्यारोहक येथून सुरवात करतात. गिर्यारोहणासाठी लागणारी सर्व साधने पुरविणाऱ्या अनेक संस्था येथे आहेत. त्या गिर्यारोहकांची उत्तम व्यवस्था करतात. पेलिंग येथील प्रसिद्ध मॉनेस्ट्री आम्ही आधीच पाहिली होती. संध्याकाळी मुक्कामी परत आलो.

अजून दोन दिवस मुक्काम येथेच होता. दररोज सकाळी लवकर बाहेर पडून दिवसभर पक्षी दर्शन असा कार्यक्रम असायचा. ऊर्जेन आम्हाला वेगवेगळ्या दिशेने घेऊन जायचा व पक्षी दाखवायचा. आतापर्यन्त पाहिलेले पक्षी तर दिसलेच काही चांगले फोटोही मिळाले व उजळणीही झाली. विशेष उल्लेख-नीय बाब म्हणजे बार थ्रोटेड मीनला व रुफस व्हेंटेड यूहीना. आमच्यासाठी दोन्हीही लाइफर होतेच. परंतु त्यांचे रंग, छोटासा आकार व ऐट पहात राहावी असे होते. आमच्या सिक्किममधील मागील ट्रीपमध्ये आम्हाला एक लेडी व्हेटर्नरी डॉक्टर भेटल्या होत्या. बोलताना त्यांनी त्यांच्या आईला पक्षी निरीक्षणाची आवड असल्यामुळे त्यांचे नाव यूहीना व त्यांच्या बहिणीचे नाव मिनला आहे असे सांगितले.

इथल्या होमस्टे मध्ये आम्ही आता चांगलेच रुळलो होतो. खूप थंडी असल्यामुळे आम्हाला जेवण आता डायनिंग रूम ऐवजी किचन मध्येच मिळायचे. तेथे चांगलीच उब असायची. बांधलेला ओटा, टेबल टॉपवर मातीच्या शेगड्या रोवलेल्या होत्या. उभ्या उभ्या सगळे करता येत होते. ह्या होम स्टे मध्ये, स्वयंपाकघरात वापरण्यात येणारा भाजीपाला त्यांच्याच शेतात जैविक खतांच्या साहयाने पिकवलेला वापरला जायचा. सिक्किम मध्ये सर्वत्र जैविक खतेच वापरली जातात. जेवणं आवरली की शेगडीवर हात कोरडे करून, चेहरा शेकून, जळलेल्या लाकडाचा वास घेत आम्ही रूममध्ये जात होतो. उद्याला केवजिंग सोडायचे होते. सगळी आवरा आवर झाली. गाडीची व्यवस्था केली. लवकर जेऊन झोपलो.



**रुफस व्हेंटेड यूहीना**

सकाळी सर्व आवरून खाली उतरलो. आता पुढचा मुक्काम २ दिवसांचा होता. केवजिंग पासून ३० किमी. वर बोरांग नावाचे गाव आहे. तेथे वाइल्ड फ्लॉवर रिट्रीट मध्ये आमचा मुक्काम होता. ह्याची माहिती नेटवरच मिळाली होती. आता आमच्या बरोबर गाईड नव्हता. सकाळी मोठी गाडी दारात उभी. हमे तो छोटी गाडी चाहिये थी । हा । मेरे घर जा के गाडी चेंज करेंगे । ड्राइवर जीवन छेत्री, केवजींग मध्ये चार दिवस तो आमच्या बरोबर होता. त्यामुळे आमची चांगलीच मैत्री जमली होती. त्याचे घर रवांगला बुद्धा पार्कच्या पुढे होते. आम्ही त्याच्या घरी गेलो. घर खाली उतारावर होते सावकाश एकमेकांना सांभाळत त्याच्या घरी पोचलो. घरी चहाचा आग्रह झाला. पुन्हा मोठा कप भरून चहा समोर आला. ही घरं सगळ्या सुखसोईंनी सुसज्ज होती. टापटीप, नीटनेटकी, स्वच्छ व सुशोभित. त्यांची घरे व मानसिकता बघून आपल्या घरांची आणि मानसिकतेची ....... वाटली. मला वाटते ही मंडळी निसर्गाच्या सान्निध्यात राहतात, त्यांना कायम निसर्गाच्या लहरीपणाचा अनुभव येतो.




बार थ्रोटेड मिनला

त्यामुळे त्यांची मानसिकता फारच वेगळी आहे. सिक्किम मध्ये काही गाड्यांवर लिहिलेले असे " we accept life as it is ". सुशोभीकरणासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी सिलिगुडी (१००किमी.) वरून आणाव्या लागतात. आपल्याकडे जशा सर्वत्र स्कुटर आढळतात तशा इथे सर्वत्र गाड्या आहेत. अर्थात टुरिस्टच्या व्यवसायामुळे असेल कदाचित. हे सगळं जरी असलं तरी चढ उताराच्या बाबतीत त्यांनी निसर्ग जसा होता तसाच जपला आहे. खरचं कौतुकाची गोष्ट होती ती. आम्ही त्याचे कौतुक करत गाडीत बसलो. गाडी बोरांगच्या रस्त्याला लागली. आता ड्राइवर सुद्धा काही पक्षी आढळल्यास गाडी थांबवत होता. इथे ग्रीन टेल्ड सनबर्ड अगदी हाताच्या अंतरावर उन्हात खूप वेळ मिळाला. दुपारच्या जेवणापर्यंत गाडी बोरांग रिट्रीटच्या दारात पोचली.

## छोट्या पक्ष्यांची शाळा - **बोरांग**

रिट्रीटच्या ऑफिस मध्ये त्या परिसरात दिसणाऱ्या पक्ष्यांचे अप्रतिम फोटो लावले होते. आमच्या रूमच्या समोर वाहता रस्ता होता. बाकी हॉटेलचा पसारा रस्त्याच्या खाली होता. मुलांनी आमच्या रूमचे दार उघडून दिले. सामान ठेवून तो खाली चहा आणण्यासाठी गेला. खोलीत एक आडवा आरसा होता. स्वच्छ काच व रुंद लाकडी  पॉलिश केलेली फ्रेम. आडव्या आरशाची कल्पना फारच भारी. खोलीला एक छोटीशी बाल्कनी होती. त्यात मावतील अशा दोन फोल्डिंगच्या खुर्च्यांची व्यवस्था होती. समोरच एक ख्रिसमस ट्री होते.



वाईल्ड फ्लॉवर रिट्रीट ( बोरांग )

त्यावर पक्षी बसायचे. मागे दूरवर हिरवे घनदाट जंगल, निळे आकाश फोटोग्राफी साठी आणखी काय पाहिजे ! ह्या शिवाय बाल्कनीतून दिसणारी हिमाच्छादित पर्वत रांग म्हणजे सोने पे सुहागा. पुणे सोडून सुमारे दोन आठवडे झाले होते. आठ दहा दिवस बरीच पायपीट केली होती. सर्व काही उपलब्ध होते.

सर्व थकवा बाल्कनीत उभे राहूनच निघून गेला. चहा घेऊन मुलगी आली होती, खुर्च्या टाकून उन्हात बसून चहा झाला. आवराआवर करून आम्ही खाली उतरलो. सवयी प्रमाणे गोरेंनी पायऱ्या मोजल्या, डायनिंग हॉल पर्यंत ५२ पायऱ्या होत्या. त्याच्याही खाली बागेत आम्ही पक्षी पहायला उतरत होतो. फोटोग्राफीच्या ओढीने कित्ती चढ उतार केली, तोल सांभाळत सर्कस केली, मान मोडेस्तोवर उंच शेंड्यावर नजर खिळवून पक्षी टिपले त्याला गणतीच नाही. आवाजावरून पक्षांचा शोध घेत होतो, अखंड सावध तर रहावेच लागत होते. एकमेकांना सांभाळत आमची फोटोग्राफी चालू होती. सर्वांग सुंदर व्यायाम घडत होता. शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि नात्यातील सुद्धा. नात्याला बळकटी येत होती.

पायऱ्या उतरताना सगळीकडे जांभळ्या छोट्या फुलांची सजावट केली होती. त्यावर मधमाशी खेळत होती. पायऱ्यांच्या दोन्ही बाजूला चहाची झाडे होती. सन बर्डसाठी फुलांची झाडे होती. त्यांची फळं पण त्यांना उपलब्ध होती. एका आडोशाला सिमेंटचा चौथरा बांधून त्यात पाणी राहील असा खोलगट भाग पण केला होता. त्या समोरील रूमच्या व्हरांड्यात खुर्च्या टाकून बसण्याची सोय होती. एकंदर फोटो सेशन साठी स्टेज तयार होते. दुपारी २ च्या दरम्यान आम्ही खाली उतरलो. बागेत गेल्यावर सनबर्डची जोडी, ग्रीन बॅक टिट, रुफस सिबिया, बुलबुल यांनी आमचे स्वागत केले. डायनिंग रूमच्या बाजूलाच थोडे खाली गेल्यावर तेथे हॅण्डमेड पेपर संबधी काही व्यवसाय चालतो असे समजले. दुसऱ्या दिवशी सकाळी तेथे जाण्याचे ठरविले. आता सूर्य परतायला लागला होता, हळूहळू अंधारून यायला सुरवात झाली आणि आम्ही खोलीत बंदिस्त झालो, बाल्कनीत बसून चहा घेतला. दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम ठरवला. कॅमेरे तयार केले. रात्रीच्या जेवणानंतर आम्हाला हॉट वॉटर बॅग मिळाल्या.

सकाळीच खाली उतरलो, नाष्टा केला आणि फोटोग्राफीच्या जागेवर जाऊन बसलो. एका मुलाने चौथऱ्यावर तांदूळ टाकले. स्वच्छ सूर्यप्रकाश होता. तांदूळ टाकल्याचे समजताच निरनिराळे पक्षी तेथे हजेरी लावू लागले. रेड बिल्ड लिओथ्रिक्स हा थंड प्रदेशात दिसणारा पक्षी. साधारण चिमणीचा आकार,



रेड बिल्ड लेओथ्रिक्स



डार्क ब्रेस्टेड रोजफिन्च

लाल चोच व पिसावर निळा, लाल, पिवळा असा पट्टा गळ्याखाली पिवळसर ऑरेंज रंग. बऱ्याच संख्येत हजर होते. त्यांच्या जोडीला डार्क ब्रेस्टेड फिंच, चिमणीपेक्षा थोडा मोठा, रेड व्हेंटेड बुलबुल, ओरिएण्टल टर्टल डव्ह, शिवाय बाजूच्या फुलझाडांवर सन बर्डची जोडी येत जात होतीच. पक्ष्यांची येथील वर्दळ कमी झाल्यावर आम्ही हॅण्डमेड पेपरच्या शेड मध्ये गेलो.

येथे हॅण्डमेड पेपर बनविला जातो व त्या पासून निरनिराळ्या वस्तू बनवतात. १०/१० रु. प्रवेश फी देऊन आत गेलो. ह्या कागदासाठी एका झाडाचा वापर करतात. ह्या झाडाची साल कुटून त्याचा लगदा करून एका ट्रे मध्ये पसरतात. हे ट्रे निथळत ठेवतात. ह्या लगद्यावर प्रेशरने दाब देऊन पाणी काढतात. नंतर ते दोरीवर वाळत घालतात. ह्या बद्दलचे सर्व ट्रेनिंग पुणे येथील हॅण्डमेड संस्थेमध्ये मिळते असे तेथील मॅनेजरने सांगितले. या कागदापासून शोपीस, डायरी कव्हर, फेल्ट हॅट, पाकीट, पिशवी, फोल्डर इत्यादी विविध वस्तू येथे बनविल्या जातात. चार स्त्रियांना काम मिळते. तेथे आम्ही अक्रोड पासून बनवलेल्या किचेन पाहिल्या. अक्रोडला छिद्र पाडून वाळत ठेवतात त्यात मुंग्या शिरून आतील गर खाल्यावर अक्रोड पोकळ होतो व त्याचा किचेन साठी वापर करतात.

सकाळी एकदा खाली उतरलो की एकदम संध्याकाळीच रूममध्ये जायचे असे आम्ही ठरविले. दुसऱ्या दिवशी आम्ही सनबर्डचे फोटो काढले. एका ग्रीन बॅक्ड टिटचा पाठलाग करत मी किचनच्या मागे असलेल्या बगिच्यात आले. बगिच्यात लाल फुले फुलली होती. त्यावर तो मधुरस पिण्यासाठी लटकला होता. प्रत्येक फुलावर अधांतरी उडत अलगद चोच घालून मधुरस शोषून घ्यायचा. कसे कळत असेल? ह्या फुलात मधुरस आहे की नाही. आताच त्यावरून दुसऱ्यानं मधुरस घेतला असेल तर? का प्रत्येक फूल एक रसाची फॅक्टरी असेल? की द्रौपदीची थाळी? अक्षय पुरवठा, पुन्हा एकदा त्या निर्मात्या विषयीचा आदर दाटून आला. त्याने प्रत्येक चोचीसाठी अक्षय अन्न बहाल केलंय. अंधार दाटून येत होता. आज मुलांनी आधीच सांगितले होते की




ग्रीन बॅक्ड टिट

रातका खाना हम उपरही लेके आएंगे। ८ वाजता जेवण करून झोपी गेलो. उद्या सकाळी आम्ही गंगटोकसाठी येथून निघणार होतो. आज सकाळीच दुसऱ्या एका टुरिस्ट बरोबर बोलताना त्यांनी पश्चिम सिक्किम मधील कालूक बद्दल सांगितले होते. कालूक म्हणजे कांचेनजुंगाचे हमखास दर्शन असे ते म्हणाले. त्यामुळे आम्ही तेथे जाण्याचे ठरविले. अर्थात आम्हाला गंगटोक येथे जाऊन उत्तर सिक्किम मध्ये लाचेन व लाचुंग येथे जायचे होते परंतु बर्फ पडत असल्यामुळे तेथे जाण्यासाठी परमिट देणे बंद केले होते. म्हणून आम्ही कालूकचा पर्याय राखून ठेवला होता.

आम्ही एप्रिल २०१७ मध्ये सिक्किम मध्ये आलो होतो तेव्हा ज्या गाडीतून फिरलो, त्या गाडीचा ड्राइवर विनयची व आमची चांगलीच दोस्ती झाली होती. त्याच्याशी आधीच संपर्क केला होता. त्याने आम्हाला बोरांग येथून पिकप करण्यासाठी येण्याचे कबूल केले. त्याप्रमाणे तो सकाळी लवकरच आला. त्याच्या सांगण्यावरून आम्ही नामची,




**ग्रीन टेल्ड सनबर्ड (फिमेल)**



**ग्रीन टेल्ड सनबर्ड (मेल)**

जोरथांग मार्गे गंगटोकला जाण्याचे ठरविले. त्याप्रमाणे आम्ही बोरांगचा निरोप घेऊन नामचीकडे निघालो.

नामची हे दक्षिण सिक्किम जिल्ह्याचे मुख्य ठाणे. नामची जवळ सामुद्रपस्ते हिल वर बौद्ध गुरु पदमसमभव यांचा सुमारे १२० फूट उंचीचा पुतळा आहे. त्या वेळी तेथे दुरुस्तीचे काम चालू होते. त्यामुळे आम्ही लांबूनच दर्शन घेतले. तिथे दुकानात की चेन दिसल्या तेव्हा मुलांची आठवण झाली. मुलं लहानपणी असल्या वस्तू साठवत होती. पण आता हेतुपूर्वक खरेदी केली नाही. आमच्यासारखे आमचे विचारही भूतकाळात फेरफटका मारून आले. ह्या मॉनेस्ट्री मध्ये एके ठिकाणी एक वाक्य लिहिले होते 'to be happy in life, three things are essential learning, erning & journing'. कित्ती छान ना ! गाडीची वाट पहात होतो, तेव्हा आमचे लक्ष बाजूला खेळणाऱ्या लहान मुलांकडे गेले. मुलं बहुदा बाजूच्या दुकानदारांची असावीत. मुलं उपजतच अनुकरण प्रिय प्रवृत्तीची असल्यामुळे त्यांनी त्यांचे पण दुकान थाटले होते. सगळा खेळ दगड मातीचाच होता. आजूबाजूला पडलेले ग्लास, डिश, दगड, माती गोळा करून त्यातच मुलं हॉटेल हॉटेल खेळत होती. मोठी मुलगी दोघा लहानांकडून कामं करवून घेत होती. ती मुलं अगदी मन लावून खेळत होती. रस्त्याच्या कडेला उतार होता. तेथे ती खेळत होती. गाड्यांची ये जा सारखी सुरु होती. सगळे बघून धस्स झाले. ना मुलांना भीती ना पालकांना त्याचे काही. सगळे कसे सहज चालले होते. आपण सारखी मुलांची काळजी करतो, सारखे हात धर, समोर बघ, पायाखाली बघ, पडशील. किती सूचना करत असतो ना आपण? मग प्रश्न असा पडतो की काळजी करणं, काळजी घेणं इतकं आवश्यक आहे का ? काळजी करावी का नाही, अनेक विचार नाचून गेले ...... मुलं मातीत खेळत होती तरीही आनंदी होती. मानव निर्मित खेळणी खेळताना इथली मुलं दिसली नाहीत. मातीशी, निसर्गाशी नातं जोडून खेळत होती. एका ठिकाणी रस्त्याचे बांधकाम चालले होते ती मुले पण असेच खेळतांना दिसली. अगदी लहान मुलं तर उघडी नागडी मातीत विना संकोच खेळतांना दिसायची. कोंबड्या, कुत्री, मांजरी हीच त्यांची खेळणी. चढ उतारावरून चढणं, पळणं

असलेच त्यांचे खेळ होते. ही मुलं स्वतःच आपली खेळणी बनवत असतील, एके ठिकाणी एक छोटा मुलगा स्वतः कोयतीने बांबू तासून बासरी बनवत होता. मन लावून त्याचे काम चालू होते. त्याच्या आवाजाने आमचा पक्षी उडाला म्हणून आम्हाला जरा रागच आला. आजूबाजूला मोठे माणूस कोणी नव्हते. हा लहान मुलगा येथे एकटा कसा काय आला होता ? काय माहीत ! बांबूवर प्रयोग करत होता. मी विचारले आप क्या बना रहे हो ।



श्री. साईबाबा मंदिर, नामची

वो बोला जो भगवानके हाथमे होता हैं ना वही बना रहा हूँ । इथे असाच कुठे तरी देव असेल का ? ज्याचा त्याला तो भेटत असेल नाही का ? अशाच नीरव शांततेत असतो तो. मला वाटते तो देव असाच सर्वार्थाने सर्व शक्यतांसह आपल्याला भेट देत असेल, आणि एखाद्या कलाकृतीच्या रूपाने प्रकट होत असेल. माझे विचार चालू होते. त्याचा एकांत त्याला बहाल करून आम्ही त्याच्यापासून दूर गेलो. गरीबाच्या भोवती देव सतत वावरत असतो. त्याचे भरण पोषण करत असतो. गरीबाच्या गाई देव राखी. या म्हणीची प्रचिती देत

गाडी धावत होती. माझे विचारही चारचाकीवर आरूढ झाले. आपण कृत्रिम खेळणी खरेदी करून मुलांना देतो. झाडे, डोंगर, प्राणी मुलांच्या हातात देऊन खोलीला चित्रांनी सजवून एसी लावून दूर ठेवतो. निसर्गापासून ! सुटीत बागेत नेतो. कृत्रिम पुस्तकी ज्ञान देतो. मग योग्य कोणते पालक ? गाडी पुढे जात होती. वाटेत छोटे छोटे पक्षी भेटत होते. तसे विचार मागे पडत गेले.

आता आम्ही नामची येथील साईबाबा मंदिरासमोर आलो. बूट काढून पुढे सरकलो. थंडीमुळे सर्वांच्या पायात मोजे तसेच होते. दरवाज्यापाशी दोन मुली उभ्या होत्या. त्यांनी हातावर पाणी घातले व आत जाण्यास परवानगी दिली. हातानी बूट काढले होते म्हणून हात धुवून आत जायचे. फारच छान, आम्ही प्रफुल्ल चित्ताने मंदिरामध्ये प्रवेश केला. स्वच्छता, शांतता, सौंदर्य, दैवी अनुभूतीने प्रभावित होत आम्ही हात जोडले. मस्तक चरणावर ठेवत प्रार्थना केली आणि सभोवार चित्रे पहात व त्यांचे रसग्रहण करत, एकमेकांना दाखवत फिरलो. मंदिराचे सिलिंगवर आकाशी रंग व त्यात ग्रहतारे चित्रित केले होते. घरात असे काही रंगकाम करता येईल का याचा विचार करत व एक नवीन संकल्पना डोक्यात घोळवत आम्ही मंदिरात फिरलो. तेथील पहिल्या मजल्यावर श्री. साईबाबांच्या आयुष्यातील प्रसंग फार सुंदर चित्रीत केले होते.

पक्षी शोधत गाडी हळू चालली होती. आमचा सारथी विनय पहिल्यापेक्षा चांगलाच अनुभवी झाला होता. आता त्याची स्वतःची नवी कोरी गाडी घेऊन तो आला होता. आम्हाला पक्षी पहायचे असतात असे त्याला माहित असल्यामुळे त्याचेही लक्ष बाहेर असे. पक्षी दिसला की योग्य जागी गाडी पार्क करून तो आम्हाला फोटो काढण्यासाठी उतरवायचा. नामचीचे आणखी एक आकर्षण म्हणजे तेथील चारधाम मंदिर. थोड्याच वेळात आमची गाडी तेथे पोचली. तेथे सोलोफोक हिलवर एका प्रशस्त जागेत चारधामच्या प्रतिकृती उभारल्या होत्या. बारा ज्योतिर्लिंगाच्या पार्श्वभूमीवर सुमारे ८७ फूट उंचीची एक भव्य शिव प्रतिमा होती. आम्ही पायऱ्या चढून वर गेलो. बराच मोठा परिसर होता तो. वाटेत एकाने आम्हा उभयतांचा फोटो आमच्या कॅमेऱ्यात काढून दिला. आमची वयं कदाचित आता सगळ्यांना कौतुकाची वाटत होती. वाढलेलं वय सगळ्यांच्या

नजेरेतून शब्दातून आमच्या पर्यंत पोचत होतं. अधून मधून हात धरून क्रॉस करणं, चढणं, उतरणं, एकमेकांची काळजी करणं या गोष्टी प्रकर्षाने घडत होत्या. आम्ही चारधाम, बारा ज्योतिर्लिंग सर्व यात्रा पूर्ण केली. एक अनपेक्षित अनामिक समाधान आमच्या पदरात पडले होते. मन:शांती मिळाली होती. तृप्त



चारधाम, नामची

मनाने आम्ही गाडीत बसलो. विनयचे आभार मानत तोंड भरून कौतुक केले. सूर्यप्रकाश कमी झाल्यामुळे कॅमेरे बंद केले. गाडी सुसाट गंगटोकच्या दिशेने निघाली. संध्याकाळी आम्ही हॉटेलवर पोचलो. दुसरा दिवस आम्ही विश्रांती साठी ठेवला होता.

गंगटोक (पूर्व सिक्किम) सिक्किमची राजधानी, सुमारे ५४०० फूट उंचीवर वसलेले शहर. टुरिस्टच्या दृष्टीने महत्वाचे ठिकाण. झू, ऑर्किड संग्रहालय,

**रुमटेक मॉनेस्ट्री, हनुमान टोक, गणेश टोक, नाथू ला पास, छांगु लेक अशी प्रेक्षणीय स्थळे. आम्ही येथे हेलिपॅड जवळील एका हॉटेल मध्ये राहिलो होतो.**



गंगटोकच्या हॉटेल मधून दिसणारे दृश्य

## वारसे ऱ्होडोडेंड्रॉन सँक्चुअरी - ओखरे

दि. १७ रोजी सकाळी विनय गाडी घेऊन आला. आम्ही ओखरे च्या दिशेने निघालो. ओखरे (पश्चिम सिक्किम) उंची ७५०० फूट व गंगटोक पासून ११० किमी. येथील होम स्टेचे मालक ऊर्जेन शेर्पा यांची व आमची आधीच ओळख होती. ह्या होम स्टे मधील प्रशस्त खोल्या व उत्तम सजावट फारच मनमोहक होती. ओखरेच्या रस्त्यावर थोडे एका बाजूला विनयच्या मामाचे घर होते. त्याच्या आग्रहावरून आम्ही घरी गेलो. त्याच्या मामांचा व कुटुंबीयांचा परिचय झाला. तेथे त्याची आजी ही होती. आम्हाला व आजींना एकमेकांची भाषा समजत नव्हती तरीही एकमेकांच्या हावभावांवरून आम्ही बरेच काही बोललो.



ओखरेच्या वाटेवरील रानटी फुले

त्या दिवशी सकाळपासूनच वातावरण ढगाळ होते. त्यामुळे फोटो काढण्यावर मर्यादा होत्या व पुढे तर पाऊस सुरु झाला. ओखरे येथे साधारण २

वाजता पोचलो. होम स्टेमध्ये सामान टाकले, चहा घेतला व तसेच तेथून १० किमी. वर हिले येथे असलेल्या वारसे ऱ्होडोडेंड्रॉन सँक्चुअरी मध्ये जाण्यासाठी



हिले च्या वाटेवरील बर्फाची आकृती

निघालो. शेर्पाने आधीच सांगितले होते की रस्त्यावर बर्फ असेल तर मागे फिरा. आम्ही सावकाश पुढे जात होतो. काही किमी. गेल्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजूला बर्फ होते. विनयने सावकाश गाडी चालवत गाडी सँक्चुअरीच्या गेट पर्यंत नेली. तेथे थोडा वेळ थांबलो. परंतु वातावरण स्वच्छ होण्याचे चिन्ह दिसेना. म्हणून परत होम स्टेच्या दिशेने निघालो.

दुसऱ्या दिवशी सकाळी स्वच्छ ऊन पडले होते. आम्ही लवकरच बाहेर पडलो व पुन्हा हिलेच्या दिशेने निघालो. सँक्चुअरीच्या दारात गाडी पार्क करून आजूबाजूला पक्षी बघत फिरलो. हिले येथून सुमारे ५ किमी. चा ट्रेक आहे, रस्ता सँक्चुअरी मधून पुढे वारसे पर्यंत जातो. ह्या वेळी बर्फ असल्यामुळे



स्पॉटेड लाफिंग थ्रश



हिमालयन ब्लू टेल (मेल)

आम्ही तेथे न जाण्याचा निर्णय घेतला. पार्किंग जवळ आम्हाला स्पॉटेड लाफिंग थ्रश, चेस्ट नट क्राऊन्ड लाफिंग थ्रश, व्हाईट ब्रोड फुलवेट्टा इत्यादी पक्षी दिसले. दुपारी होम स्टे कडे परत फिरलो. रस्त्यात एके ठिकाणी बर्फाचे फार छान डिझाईन तयार झाले होते. जेवणानंतर ओखरेच्या इतर रस्त्यांवर चक्कर मारली व पक्षी दिसतील तसे फोटो घेतले. आम्ही लगेच दि. १९ रोजी परत गंगटोक ला जाण्याचा निर्णय घेतला.

दुसरे दिवशी सकाळी लवकरच तयार झालो, चहापाणी झाल्यावर घरातील वरिष्ठांनी आमच्या गळ्यात रेशमी वस्त्र घालून आम्हाला निरोप दिला व आमच्या प्रवासाला शुभेच्या दिल्या. आम्ही जोरथान्ग मार्गे परत गंगटोक ला जाण्यासाठी निघालो. पक्षी बघत, फोटो काढत ५ वाजे पर्यंत गंगटोक च्या आमच्या हॉटेल मध्ये पोचलो.

एप्रिल २०१७ मध्ये आम्ही फाम्बंगलो येथे गेलो होतो, तेव्हा तेथील वातावरण व रहाण्यासाठी बनवलेली कॉटेजेस पाहून आम्हाला तेथे रहावयाचे होते परंतु त्या वेळी तेथे जागा नव्हती व आमच्याजवळ वेळ कमी होता. आत्ता जमल्यास विचार करू असे ठरविले. आज दि. २० होती. आम्हाला परतीच्या प्रवासासाठी दि. २५ ला संध्याकाळी परत न्यू जलपैगुडी येथे यावयाचे होते. लाचेन व लाचुंग येथे जाण्यासाठी परमिट मिळत नव्हते. विनय म्हणाला मै आपको एक और जगह दिखाऊंगा आपको पसंद आयेगी तो वहा जायेंगे । आम्ही दि. २० रोजी सकाळी गंगटोक जवळ असलेल्या फाम्बंगलो वाईल्डलाईफ सँक्चुअरी येथे जाण्यासाठी निघालो. फाम्बंगलो गंगटोक पासून सुमारे ३० किमी. अंतरावर आहे.

आम्ही गंगटोक शहराच्या बाहेर आलो व उजव्या हाताला आम्हाला अनपेक्षित बर्फाची शिखरे दिसायला लागली. ते अर्थातच कांचेनजुंगा चे दर्शन होते. कॅमेऱ्यात पॅनोरॅमिक व्ह्यू घ्यायची सोय असल्यामुळे मी पॅनोरॅमिक व्ह्यू घेतला. हा कांचेनजुंगा माउंटनचा काही भाग होता.

निसर्ग सौन्दर्य पहात पहात, फोटो काढत, थंडीत कुडकुडत आम्ही पुढे सरकत होतो. इतक्या थंडीतही पक्षी दिसला की गाडी थांबवत पुढे मागे पळत होतो. कडेला फ्लेक्स पडलेले दिसत होते. फ्लेक्स म्हणजे बर्फाचा भुगा. आपण लहानपणी बर्फाचे रंगीत गोळे खाल्ले ना. त्याची आठवण झाली. गोळे करून खावेसे वाटले. पण छे पाणी पिणे मुश्किल तर गोळे कुठले खातोय. गोळ्यांची गंमत विनयला सांगितली. त्यालाही मजा वाटली.



कांचेनजुंगा व्ह्यू

गवत, झाडं झुडपं, डोक्यावर बर्फाच्या टोप्या घालून वाऱ्यावर आनंदाने डोलत होती. आम्हाला अजून वर चढायचे होते. वर बर्फ असण्याची दाट शक्यता होती. ओखरेची पुनरावृत्ती व्हायची. दोघांच्या मनात पाल चुकचुकली. विनयने ऑफिसच्या दारात गाडी थांबवली. आम्ही एन्ट्रीची पावती फाडली व गेट मधून आत गेलो. अजूनही चढ होता, रस्ता फारच खराब होता. थंडी वाढली होती, दोन्ही बाजू बर्फाची बॉर्डर काढून सजल्या होत्या. कसले कसले आणि कित्ती कित्ती फोटो काढणार. अशा थंडीत पक्षीही फारसे बाहेर येत नाहीत.

विनयने गाडी पार्क केली. आम्ही तेथील कर्मचारी रहात असलेल्या शेड पाशी गेलो. कॅन्टीन मध्ये चहा घेतला व गोरे एक चक्कर मारून आले. आतील एका बाईने बाहेर धान्य टाकले त्यासाठी एक कोंबडी, तिची आठ दहा पिलं, बरेच चेस्ट नट क्राऊन्ड थ्रश बाहेर आले. प्रत्येक जण जे मिळेल ते उचलत होता. बघायला खूप मजा आली. मी जमेल तसे फोटो काढले. अक्षरश: डोळ्यांचे पाते लवते न लवते तो सगळा फडशा पडला सुद्धा. घरातले खरकटे आणि शिळे अन्न फस्त झाले होते. दारात अशी वस्ती असल्यामुळे शिळ्या अन्नाचा प्रश्न चुटकी सरशी सुटतो ना ! परत अंड्यांची सोयही होते. कुत्र्यांची सोबत तर होतेच होते. कारण सँक्चुअरी मध्ये रहायचे म्हणजे कोणत्याही प्राण्याशी केव्हाही गाठ. गोरे सगळे फिरून आले. मला आग्रहाने वर घेऊन गेले. वर टुमदार कॉटेजेस बांधली आहेत. कॉटेजेस समोर पांढरी शाल पांघरून बसलेला माउंटन, रंगीबेरंगी कॉटेजेस, उतारावर रंगीत फरशीच्या पायऱ्या. एप्रिल १७ मध्ये आलो होतो तेव्हा उतारावर सगळीकडे वाईल्ड स्ट्रॉबेरीचे रान पसरले होते. ह्या स्ट्रॉबेरीज छोट्या असतात. चव नेहमीचीच. त्यावेळी आम्ही ह्या स्ट्रॉबेरीज वेचल्या होत्या. विनयला त्याची आठवण झाली. त्या वेळी असे वाटले की कोणीही यावे कितीही खाऊन जावे, निसर्गाने इतके अमाप दिले आहे ना बस! अर्थात त्या अंनताने अनंत हस्ते अनंत, अमाप, अमर्याद इतकं देऊन ठेवलंय की माणसांनी कितीही कसाही वापर केला तरी ते संपण्यातले नाही. जसे डोंगर रांगा, ढग, बर्फ, आकाश, चांदणे, थंडी, ऊन, पाऊस ह्या शिवाय माणूस, पशु, पक्षी, पाने, फुले, फळे, कीटक सगळे सगळे अगणित पहायला मिळाले. नुसती संख्याच नाही तर प्रकार सुद्धा अगणित. काहीही कमी नाही. तोडितां तरु फुटे आणखी भराने. एका बीजा पोटी तरु कोटी कोटी जन्म घेती सुमने फळे. ह्या ओळी आठवल्या. तीच गोष्ट जीवनाची. तर....... असे आहे सगळे. या अशा विचारात आम्ही गाडी पाशी येऊन पोचलो. थंडी तशी बरीच होती. ओखरेची पुनरावृत्ती होण्याची दाट शक्यता होती, उन्ह असून सुद्धा थंडीला जोर होताच. रात्रीच्या थंडीची कल्पना करूनच आम्ही तिथे रहाण्याचा विचार सोडून दिला. तिथे जेवणाची व्यवस्था पण यथा तथाच. मागचा अनुभव होताच. आमच्या

कडचे दिवस कमी होते. कालूकला जाण्याचे निश्चित केले. त्यामुळे आम्ही तेथून निघायचा निर्णय घेतला. मात्र जाता जाता आम्हाला एका रुफस सिबियाने दर्शन दिले. निळ्या बॅकग्राऊन्ड्वर व स्वच्छ उन्हात फार छान पोज दिली. एका अनामिक ओढीनेच आम्ही मागे फिरलो.



रुफस सिबिया

विनय एका ग्रुपबरोबर एका रिसॉर्ट वर आला होता. त्याने सांगितले आपण तेथे जाऊ, तुम्हाला आवडले तरच तेथे रहाण्याचे ठरवा. पक्षी बघतच तेथे गेलो. तिथले वातावरण आवडले. गंगटोक मधील रुमटेक मॉनेस्ट्री पासून पुढे सुमारे २० किमी. वर मारतम नावाचे एक छोटे खेडे आहे. आम्ही तेथील मारतम व्हिलेज रिसॉर्ट मध्ये दोन रात्री व त्यापुढील दोन रात्री कालूक येथे रहाण्याचे ठरविले. संध्याकाळी पुन्हा गंगटोकच्या हॉटेल वर आलो. दुसऱ्या दिवशी सकाळी मारतम येथे जाण्यासाठी गंगटोक सोडले.

## निसर्गरम्य खेडे गाव - मारतम

सकाळच्या वेळेत बरेच पक्षी दिसले. फारशी वर्दळ नसल्यामुळे पक्षी अगदी रस्त्यावर सुद्धा फिरत होते. त्यामुळे फोटो घेणे सोपे झाले. आम्ही आता तीन आठवडे फिरत होतो. तेच तेच पक्षी दिसत होते. त्यामुळे फोटो न घेताच निरीक्षण करत होतो. सिक्किम मध्ये रस्त्यावर अनेक छोटे मोठे धबधबे वा पाण्याचे प्रवाह दिसतात. अशा ठिकाणी हमखास दिसणारा पक्षी म्हणजे फोर्कटेल. ह्या



स्लेटी बॅक्ड फोर्कटेल

पक्ष्याची कैचीसारखी व लांब शेपटी. यावरून त्याला हे नाव पडलं. त्याचे तीन प्रकार आहेत. त्यापैकी हा एक स्लेटी बॅक्ड फोर्कटेल. तो पाण्याच्या एका छोट्या प्रवाहाजवळ फिरत होता. बराच पुढे रस्त्यावर आला होता. त्यामुळे आम्हाला सहज दिसला. आम्ही गाडीतून खाली उतरलो त्यामागे धावलो. तो हळू हळू उड्या मारत रस्ता क्रॉस करत होता. त्याला आमचा साचलच लागला नाही, त्यामुळे आम्ही खुश

होतो. कांचनमृगाच्या मागे लागलेल्या रामासारखे आम्हीही गाडीला विसरून त्याच्या मागे गेलो. त्याला रस्त्यावर काय मिळत होते काही कळत नव्हतं परंतु तो आपल्याच नादात. हे पक्षी छोटे छोटे किडे खातात. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला एक काळे कुत्रे बसले होते. वाटले आता हा निघून जाईल पण तो तर कुत्र्याच्या दिशेने चालला होता. आम्ही हसत होतो. आम्ही त्याच्या डौलदार चालीचे व्हिडीओ काढले. फोर्कटेल पेक्षा आम्हालाच कुत्र्याची भीती वाटत होती. कारण कुत्रे आमच्याकडेच पहात होते. बहुदा कुत्रे बसलेल्या गवतात तो पक्षी किडे शोधत होता. आमची गाडी जवळ आल्यामुळे आम्ही दोघांचा नाद सोडून दिला. त्याच वेळी समोरून एक लाल गाडी आली तिच्या अवाजाने फोर्कटेल उडून गेला. माझ्या मनात विचार आला कदाचित फोर्कटेल आणि भू भू एकमेकांचे परिचितही असू शकतील नाही का ? त्यांच्यात कबतूर मुंगीच्या गोष्टीसारखी मैत्री पण असू शकेल ना ?

थोडे पुढे गेल्यावर विनयने गाडी एका टेरेसवाल्या हॉटेल जवळ थांबवली. टेरेस बाजूने मोकळी होती त्यामुळे आम्हाला फोटो काढता येत होते. आम्ही बुलबुल, फॅन टेल, सनबर्ड मिळतील तसे फोटो काढले. गरम भजी, चटणी व चहा यांचा नाष्टा आला. चटणीचे कौतुक करून हॉटेलवाल्याला झाडावर चढवून आम्ही गाडीत बसलो. एका पुलापाशी झाडावर पक्ष्यांचा आवाज आला. खाली उतरून त्याचा मागोवा घेत इकडून तिकडे धावलो. फूल रॅकेट खेळताना जसे फूल येईल तसे आपण धावत असतो तसेच काहीसे होत होते. गमंत बघा हं! लक्ष पक्षाकडे वरती, त्याच्या गती बरोबर आपली गती, त्याच क्षणी दुसरे लक्ष पायाखाली, रस्त्याचे भान पण, त्याच वेळी,कॅमेरा फोकस करायचा आणि मग फोटो क्लिक करायचा. हा सगळा मेळ साधेपर्यंत तो पक्षी उडून तरी जायचा किंवा बाजूला कोठेतरी दुसरा एखादा पक्षी दिसायचा. त्याच्या मागे धावत त्याला फोकस करे पर्यंत तो गायब व्हायचा. "अभी अभी यही था किधर गया जी" गाण्याची आठवण करून देत पक्षी आम्हाला पळवत होते व आम्ही पळत होतो. पक्षी न कळत कुठल्याशा दुनियेत घेऊन जायचे आम्हाला. आमची दुनिया विसरून आम्ही ही रमून गेलो त्यांच्या दुनियेत. असं रमायला आता आम्हाला जमायला लागलं होतं. जवळ जवळ महिनाभर गाडीचे पंख लावून मुक्त पणे आम्ही पक्ष्यांच्या बरोबर उडत होतो. मिळेल ते मिळेल तेव्हा खावे. अंधार झाला की अंधाराच्या कुशीत शिरावे,

पहाटेची वाट बघत. मधेच चंद्राची भेट घ्यायला मी कधी विसरले नाही. एव्हाना त्यालाही आमचा लळा लागला होता. पहाटे अडीच तीन झाले की खिडकीत टकटक करायचा चांदोबा. तो आमच्या आणि आम्ही त्याच्या मोहात पडलोय. रोज पहाटे चंद्राचे जसे मिळतील तसे फोटो काढत बसायचो. थंडी आम्हाला व आमच्या उत्साहाला, उधाणाला आवर घालायची. जसा काही पहाराच बसवला होता तिने. थंडी म्हणायची सूर्योदयाबरोबर बाहेर पडा, बाहेर गाडीचे पंख पसरून हिमालयाच्या अंतरंगात शिरा पक्षी शोधत. क्लिक करत मनसोक्त बागडा, बेफिकिरीच्या धुंदीत. मोकळ्या हवेत श्वास घेत एका नि:सिम आनंदाची उबदार शाल पांघरून, समोरच्या दृश्याचा एक अविभाज्य घटक होऊन जा आणि पहा आपल्या अंतरंगात डोकावून. खरोखर याला कसलेच नाव नाही देता येणार. आपल्याकडचा निसर्ग सुद्धा असाच आहे. अगदी आपल्या घराच्या अवती भवती सुद्धा अनेक पक्षी वास्तव्याला आहेत. माझी नजर आता तयार झालीय. आवाज आला की मी लगेच रमते. शोधाशोध सुरु होते माझी. मग लक्षात येतंय की आपल्या भोवती पण हे सगळं जसेच्या तसे आहे. आपण पक्षांचे आवाज ऐकूनही त्यातली गंमत कधी अनुभवलीच नाही. आता पहाट गाणी ऐकताना आणखीनच मजा वाटते. किती बेमालूम केली शब्द बद्ध पहाट. कवीही असतो एक चित्रकार, शब्दांच्या कुंचल्यातून रंगवतो चित्र पहाटेचे. कवितेच्या फ्रेम मध्ये हुबेहूब पहाट अवतरते. ती जेव्हा गायकाच्या गळ्यातून आपल्या कानावर पडते तेव्हा मूर्तरूप घेऊन डोळ्यासमोर उभी रहाते. सांज ये गोकुळी गाणं सुद्धा असंच अनुभवलं आम्ही. ती वेळ सुद्धा अविस्मरणीयच होती.

गाडी थांबली तशी आम्ही रिसॉर्टच्या समोर उतरलो. आम्हाला मध्यभागी रूम देऊन मुलगा चहा आणण्यासाठी खाली उतरला. रिसॉर्टचा परिसर खूपच मोठा होता. खाली डायनिंग रूम पर्यंत जवळ जवळ ४० पायऱ्या होत्या. आमच्या खोलीच्या वरच्या व खालच्या भागात भरपूर झाडे असल्यामुळे फोटो काढण्यासाठी भरपूर वाव होता. रंगीत लाल फुलांची झाडेही भरपूर होती. त्यावर लाल पाठीचा सनबर्ड दिसला. तो पक्षी म्हणजे क्रिमझन सनबर्ड. चहा सोडून आम्ही त्याच्यामागे धावलो. जेवण झाल्यावर दुपारी गाडीतून एक चक्कर

मारली. काही पक्षी बघितले व गावाबाहेरील एका मॉनेस्ट्री जवळ गेलो. सिक्किम मध्ये रस्त्याच्या दोन्ही कडेला घनदाट झाडी असल्यामुळे कोणत्याही बाजूला रस्त्यावर गेले की पक्षी दिसण्याची शक्यता असते. ४.३० वाजता रिसॉर्ट मध्ये परत आलो. हळू हळू अंधार पडू लागला.



मारतम व्हिलेज रिसॉर्ट मधील आमची खोली

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच जाग आली. आमच्या खोलीच्या अगदी समोरच्या झाडावर आम्हाला फायर ब्रेस्टेड फ्लॉवर पेकर नावाचा पक्षी दिसला. काही वेळानी फिमेल पण दिसली. झाडावरची हिरवी फळं पिकून गुलाबी होत होती. ती फळं खाण्यासाठी ही जोडी आली होती. याच्या छातीवर साधारण बदामाच्या आकाराचा ऑरेंज रंग आहे. बाकी पोट पुढचा भाग हलका पिवळा रंग, पाठीवर डोक्यापासून काळसर निळा रंग, फारच सुरेख व छोटासा पक्षी आहे हा.

मारतम व्हिलेज रिसॉर्ट मध्ये सनबर्ड चा वावर ज्या फुलावर होता. ते फूल कणसासारखे (composit flower) उभे होते. त्याला बारीक बारीक लाल फुलं

होती. त्यावर  सनबर्ड  उलटा लोंबकळायचा. तो पण फुलपाखरा सारखा चंचल आहे. एका जागी काही टिकत नव्हता. त्यात त्याचा जीव केव्हढा, चिमणी पेक्षा लहान. पक्षी व फुल दोघांचा रंग लाल, फोटो मिळवणे खूप कठीण. मग आम्ही दोन दिशेला दोन जागा पकडल्या व दोघांनी मिळून चांगले फोटो मिळवण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रत्येक वेळेला better luck next time म्हणून एक बार और ..... असे चालू होते.



फायर ब्रेस्टेड फ्लॉवर पेकर (मेल)

आता आम्ही आमच्या रूमसमोर खुर्ची टाकून फायर ब्रेस्टेड फ्लॉवर पेकरची वाट पहात बसलो. शेवटी त्याचेही चांगले फोटो मिळवले. आमच्या रूम समोरचे झाड म्हणजे एक स्टेजच झाले होते व त्यासमोर खुर्चीवर बसून आम्ही दोघे फोटो काढत होतो. काही व्हिडीओ सुद्धा घेतले. नंतर आम्हाला बाजूच्या पाचोळ्यात एक मॅगपाय रॉबिन उतरलेला दिसला. त्याला लांबूनच एक गांडूळ दिसले होते. त्याने ते उचलून बाजूच्या फांदीवर बसून खाणे आटोपले.

पहाट  होण्यापूर्वीच जाग आली. चांदोमामाशी आमचे नाते दृढ होत होते. न चुकता  पहाटे  पूर्वी चांदोमामा भेटायला यायचे.  तासभर चंद्र प्रकाशाशी हितगुज करून थंडीने गारठले की परत झोपून जायचे. हा तर आता नित्याचा परिपाठ झाला होता. कुठल्याही प्रकारचे रस्त्यावरील दिवे नसल्यामुळे चंद्र व चांदणे स्वच्छ दिसायचे. परत झोप लागली. सूर्योदयाची वेळ झाली तसे गोरेंनी हाक मारली, सूर्योदयाचे फोटो काढण्यासाठी. सूर्योदय फार कमी वेळा पहायला मिळायचा आम्ही बऱ्याच ठिकाणी फिरलो परंतु निसर्गरम्य ठिकाणी सूर्योदय पहायला पहाटे उठून बाहेर जावे लागायचे. परंतु आज मात्र आम्हाला रूमच्या ओट्यावर बसून सूर्योदय पहायला मिळाला. प्रत्येक वेळी सूर्योदय काही तरी अप्रतिम घेऊन यायचा. सर्व शूटिंग घेतले. या निमित्ताने काही आठवणी जाग्या झाल्या. माझ्या ६० व्या वाढदिवसाला माझ्या नातींनी मला सूर्योदयाचं अप्रतिम  प्रेझेंट  दिलं  होतं. एवढ्याशा चिमुरड्या पण त्यांची कल्पना बघा. तसेच महाबळेश्वरचा सूर्योदय बघून आल्यावर मला एक भन्नाट कविताही सुचली होती.



क्रिमझन  सनबर्ड  (मेल)

आजच्या सारखा उद्याचा दिवस नसतो. म्हणजे आला क्षण गेला की गेला, तो अनुभव, ती अनुभूती पुन्हा येणे नाही. अगदी स्वयंपाकाचे सुद्धा तेच हो ना ? …… सकाळचे सर्व आटोपून आम्ही उन्ह दारात यायची वाट पहात होतो. इकडे हवामान आपल्यासारखे नाही. सूर्य दिसणे म्हणजे परमेश्वर भेटल्याचा आनंद मिळत होता. रस्त्याच्या जवळील बाजूला पक्ष्यांनी गोंगाट केला होता. मी रस्त्याच्या बाजूला वर चढले. गेटपाशी कसल्याशा फळांनी लगडलेले एक झाड होते. खाली नुकतीच फळं खाऊन ताज्या बिया पसरलेल्या दिसत होत्या. माझा साचल लागल्यावर बहुदा पक्षी पसार झाले होते. आता आम्हाला एक जागा आणखी मिळाली होती. तितक्यात खालच्या बाजूने सन बर्डचा बारीकसा आवाज आला. बराच शोध घेतल्यावर एका झाडावर आडोशाला एक पान हललेसे वाटले. मी नुसती नजर टाकली. मोठमोठ्या पानांचे द्रोणासारखा आकार असलेले एक झाड, आपल्या द्रोणांच्या ओंजळीत पाणी साठवून पक्ष्यांची अंघोळीची व्यवस्था करून उभे होते. माझ्या दृष्टीने पानाचा द्रोण; पण सनबर्डसाठी तळी होती ती. त्या तळ्यात मस्त अंघोळ करून महाशय पसार झाले. हे सगळे दृश्य दिसून, त्याचा अर्थबोध होऊन, शूटिंग करणं ही सगळी एका निमिषार्धातली घटना होती. कसाबसा एक फोटो व निसटता व्हिडीओ मिळाला. आज तळ्याचे झाड पहायला मिळाले. पुन्हा शांतता पसरली. पण माझ्या मनात विचारांचा मेळाच भरला होता. मी आता वर होते आणि झाडाचा शेंडा खाली होता. प्रत्येक पान एक तळं दिसत होतं. झाडावर हिरवी गुलाबी लाल फळं लागलेली होती. " फ्रुट रेस्टोरंट फॉर बर्डस" किती मस्त कल्पना ना! पुन्हा एकदा त्या निर्मात्या विषयीचा आदर माझ्या मनाला स्पर्शून गेला. त्यानी प्रत्येकाला पोटभर अन्न तर दिलेच पण व्यवस्था पण कसली भारी केलीय ना ! प्रत्येकाची आवड निराळी. म्हणून प्रत्येकाचे झाडही आपोआपच वेगळे. या झाडावर दुसरे पक्षी आले तर या फळांना स्पर्श नाही करणार. क्षणभर विसावतील आणि निघून जातील.

आम्ही दोघे थंडी थंडी करत दोन तीन दिवसांनी अंघोळी करत होतो. हा एवढासा जीव इतक्या जबरदस्त थंडीत पानांच्या तळ्यात अंघोळ करत होता आणि ओलेत्याने आकाशात झेपावत होता. ना कथा, ना काळजी उद्याची, ना साठवण फक्त आल्या क्षणाची आठवण. भूक लागेल तेव्हा खावं, फक्त पिकलेलं खावं.

पिकण्यापूर्वी स्पर्श सुद्धा नाही करणार. स्वयं शिस्तीचे प्रणेते. विचारात इतकी बुडून गेले की मला इकडचे तिकडचे काही भानच नव्हते. गोरे खालच्या बाजूला फोटो काढत होते. त्या नीरव शांततेत मी मनसोक्त गात होते.



ग्रीन मॅग पाय

संध्याकाळी चहासाठी किचन जवळ गेलो. बाहेरच्या हिरवळीवर खुर्च्या टाकून चहा झाला. दूर एका झाडावर बराच गोंगाट ऐकू आला. पाहिले तर २०-२५ मैना जमल्या होत्या. सांज गाणी गात होत्या. खो खो चा खेळच जणू चालला होता त्यांचा. झाडाच्या एखाद्या फांदीवर त्या थोडा वेळ स्थिर रहात नंतर लगेच दुसऱ्या फांदीवर जात. पक्षी एकमेकांना दिवसभराचा अहवाल देत होते. गुजगोष्टी चालल्या होत्या, आनंदाच्या लहरी उसळत होत्या. मी लगेच व्हिडीओ घेतला.

तेव्हढ्यात रिसॉर्ट चा मॅनेजर आला, गोरेंना म्हणाला, जरा खाली जाऊन येऊ काही पक्षी दिसले तर पाहू. दोघे खाली गेले परंतु काही वेळातच ते परत आले. आम्ही जेवायची ऑर्डर देऊन वर आलो. सूर्याला पोचती करून थंडी अंधाराची शाल ओढून, वाऱ्याबरोबर खेळत राहिली.

दुसरे दिवशी सकाळी आम्ही कालूक कडे जायला निघणार होतो. सकाळी लवकर जाग आली तर थोडी फोटोग्राफी करता येईल, असे वाटले होते. परंतु त्या बाबतीत आमचे नशीब आज चांगले नव्हते. आज हवा स्वच्छ नव्हती व सूर्यप्रकाशही फारसा नव्हता. आम्ही गाडीची वाट पहात थांबलो होतो. तेव्हढ्यात एका मोठ्या झाडावर काही कलकलाट ऐकू आला. पहातो तो ग्रीन मॅग पाय आणि सिमीटर बॅब्लर यांचे भांडण चालले होते. त्यापैकी ग्रीन मॅग पायचा फोटो मिळाला. काही वेळातच गाडी आली. आम्ही मारतम रिसॉर्टचा निरोप घेतला. कालूक हा आमचा सिक्कीममधील शेवटचा मुक्काम होता.



मारतम मधील भातशेती

## कांचेनजुंगाच्या परिसरात - कालूक

कालूक हे ठिकाण काही आमच्या लिस्ट मध्ये नव्हते. परंतु बोरांग येथील एका टुरिस्ट ने सांगितल्यावरून तसेच कांचेनजुंगाच्या ओढीने आम्ही येथे येण्याचे ठरविले. आमच्याकडे फक्त दोन रात्रीच होत्या. मारतम रिसॉर्टच्या मॅनेजर ने त्याच्या ओळखीने कालूक येथील एका हॉटेल मध्ये बुकिंग केले होते.

आम्ही भरपूर नाष्टा करून निघालो असल्यामुळे चित्तवृत्ती टकाटक होती. मी पायरीवर पडल्यामुळे पुढच्या सीटवर जागा मिळाली. परंतु आज जणू काही सूर्याने सुट्टीच घेतली होती. अंधारून आलेले आकाश, असे वाटले की थोडे पुढे गेल्यावर उन्हे येऊन काही फोटो मिळतील. आज आम्ही गाडीत बसून चक्क गप्पा मारत  होतो. विनयला मराठी काही समजत नव्हते त्यामुळे त्याचा गप्पात काहीच सहभाग नव्हता. मी या हवेला मनातल्या मनात धन्यवाद दिले. आणि गोरेंना पण. मध्येच विनयला कुठल्याशा गाण्याची आठवण झाली. मग हिंदी गाणी एक कॉमन विषय झाला. तो मधून मधून ये आपको मालूम है? असे विचारत होता. मधे एके ठिकाणी गाडी थांबली, चहापाणी झाले व आम्ही पुढे निघालो. रस्त्याच्या एका बाजूला एकदम काही तरी जोरदार हालचाल दिसली. काही कळायच्या आत मिनीवेटचा एक मोठा ग्रुप एका झाडावरून दुसरीकडे उडाला. आम्ही अजून गाडीतून खाली उतरलो सुद्धा नव्हतो. एका क्षणात हे घडलं. हा पक्षी लाल रंगाचा असतो. पक्षी निरीक्षणामध्ये काही वेळा असले क्षण कॅमेऱ्यात टिपता येत नाहीत, परंतु हे क्षण डोक्यात मात्र कायमचे रहातात. आमच्या आधीच्या एका गाईडच्या सांगण्याप्रमाणें ह्या ग्रुप बरोबर सुलतान टिट असण्याची शक्यता होती. असो, एक मात्र झाले, ह्या झटक्यामुळे प्रवासात आलेली मरगळ तात्काळ नाहीशी झाली. आम्ही थोडेसे चुटपुटत आणि खूपशा आनंदाच्या मूडमधे गाडीत शिरलो. आमचे एकूण अवलोकन करत असलेला विनय बोलला. क्या मिला? मिला तो कुछ नही । लेकिन कुछ देखा तो जरूर, और जो देखा वो ला जबाब था । वो हसने लगा। मी पुढे बसून त्याच्याशी गप्पा मारत होते. तो पण खुश होता आमच्यावर. म्हणाला, आप

लोग बहोत अच्छे है । कोई टुरिस्ट लोग बहोत तंग करते है । फिर आ जाना और मुझे याद राखना । आम्ही खुश. संपूर्ण रस्ता कुठेही उन्ह नाहीत, सुन्न वातावरण. एका गतीने आम्ही पुढे सरकत होतो. विनयला काही दिसले की तो गाडी थांबवून विचारायचा, फोटो लेनी है क्या ? काही ठिकाणी तर गाडीतूनच बसून फोटो मिळायचे. आमचे या ट्रिपचे शेवटचे दोन दिवस होते. कांचेनजुंगा जवळून बघायला मिळणार होते. परंतु सर्व गोष्टी हवामानावर अवलंबून होत्या. थोडी उत्सुकता, भीती अशा वातावरणात आम्ही कालूक येथील हॉटेलच्या दारात पोचलो.




घोंडे व्हीलेज रिसॉर्ट

आमचा मुक्काम कालूक येथील घोंडे व्हिलेज रिसॉर्ट मध्ये होता. आम्ही खाली उतरलो. गोरे ऑफिस मध्ये शिरले. मी इकडे तिकडे नजर टाकली. मनात आलं पुढं सरकले. दोन फूट रुंदीचा रस्ता, त्यात हिरवळीची आयताकृती नक्षी. डावीकडे छोटी फुलझाडं. उजवीकडे (सनबर्डच्या आवडीची) लाल फुला फळांनी लगडलेली झाडं. डावी उजवीकडून खाली नेण्याऱ्या पायऱ्या. वरपासून खालचा

**रस्ता थेट दिसेल अशी सोय. खाली पार रस्त्याचा ठाव घेता येईल अशा पायऱ्या. एकीकडे मोठी घसरगुंडी. मी वरूनच सगळीकडे नजर टाकली.**



**बुद्धिबळाचा पट व सोंगट्या**

**खाली काळ्या पांढऱ्या मोठ-मोठ्या फरशा दिसल्या बुद्धिबळा सारख्या. मागे खोली होती. त्यात हत्ती, घोडे, उंट, राजा, वजीर, काळी आणि पांढरी प्यादी होती. उचलून पहिले तशी हलकी लागली. नंतर लक्षात आले, हा बुद्धिबळाचा पट आहे तर. आपण उभे राहून खेळायचा खेळ. कल्पना सुरेख वाटली. प्रशस्थ जागेवर हिरवळ, मोठी छत्री, टेबल, दोन खुर्च्या व बार्बेक्यूची उत्तम सोय. समोर लांबच्या लांब झाडी पसरलेली, मोकळे आकाश त्याच्या बॅकग्राउंडवर कांचेनजुंगा . मी अतोनात खुश झाले. तरी पण हवा अजून काही हवी तशी नव्हती. कांचेनजुंगा अजूनही धुक्याच्या पडद्यातच.**

**माझे लक्ष शेजारच्या लाल फुल झाडावरच्या हालचालींनी वेधून घेतले. साऱ्या रस्ताभर विसावलेला कॅमेरा एकदम कार्यरत झाला. हात सरसावले,**

पायांना गती मिळाली. झाड इतके जवळ की फोकस होईना, उजेड ही कमीच होता. चुट्पुटत एक सनबर्ड मिळाला. लाल, पिवळ्या, निळ्या, काळ्या रंगांनी, सौन्दर्याने समृद्ध आणि श्रीमंत सनबर्ड. आहाहा !!! अप्रतिम. त्यातून सावरतेय तोपर्यंत असा स्प्रे मारल्यासारखा एक थवा त्या झाडावर आला. तो ही सवयीने आणि अनावधानाने आलेला. माझ्या असण्याची कल्पना नसताना. लगोलग पसार झाला. मी तातडीने क्लिक करत राहिले, जसे येतील तसे फोटो व व्हिडीओ काढले. तो विलोभनीय क्षण मी आज पुन्हा अनुभवला. सकाळीच मिनिव्हेटचा थवा पाहिला होता. पुण्यात रात्री गाडीवरून जाताना रातराणीचा सुगंध एक श्वासच मिळतो तसा. नंतर फोटो पाहिल्यावर असे दिसले की तो यूहीनाचा थवा होता. चिमणी एवढा आकार, डोक्यावर ऑरेंज क्रेस्ट, बाकी हलका ऑफ व्हाईट रंगाचा गोंडस पक्षी. विलोभनीय स्मृतींच्या पेन ड्राईव्ह मध्ये सेव्ह झाला, आणखी एक अनुभव.

इतके होईतो गोरे सामानासह खोलीत पोचले होते. पाचव्या मजल्यावरील खोली होती. थोड्या वेळाने मी ही खोलीत पोचले. आम्हा दोघांना वेलकम ड्रिंक म्हणून लेमन टी दिला. रूम मध्ये दरवाजासमोर एक मोठी खिडकी होती. ती मोठी खिडकी म्हणजे जणू काही आमच्या कांचेनजुंगाच्या दृश्याची फ्रेमच होती. परंतु आतील चित्र मात्र धूसरच होते. दूरवरच्या झाडावर काही हालचाल जाणवली. गोरेंनी फोटो काढला, म्हणाले पिवळ्या पोटाच्या चिमण्या असतील, हा त्यांचा अंदाज खरा ठरला. हलका पिवळा रंग डोक्यावर पण असतो. आम्ही सर्व आवरून खाली उतरलो. अजून वातावरण तसेच होते. आजचा दिवस संपत आला होता. उद्या ट्रिपचा शेवटचा दिवस होता. तेथील जवळच एका गावात विनयचे आई वडील रहात होते. त्याला तेथे जायचे होते. तो म्हणाला सुबह जल्दी आ जाऊंगा। तो निघून गेला, आम्ही हिरवळीवर बसून भजी, चहा असा नाष्टा केला. अखेर सूर्य परतीला लागला तशी थंडी वाढू लागली. आम्ही जेवणाची ऑर्डर देऊन वरती आलो.



पिवळ्या पोटाच्या चिमण्या



सोनेरी कांचेनजुंगा

सकाळी थोडे निवांत उठलो. विनय ठरल्या वेळेला आला. गावाच्या दोन्ही बाजूच्या रस्त्यावर दिवसभर फिरलो. हवा कालच्यासारखीच होती. वाटेत दोन प्रकारचे बार्बेट दिसले, उगीचच फोटो काढत वेळ घालवत होतो. विनय आम्हाला हॉटेल वर सोडून घरी गेला. दुसरे दिवशी आम्हाला कालूक सोडायचे होते. लवकरच जेवून घेतले. काही वेळ गप्पा मारल्या व झोपी गेलो. आता आमच्या हातात फारतर उद्या सकाळी ९ वाजेपर्यंतचा वेळ होता. अखेरचा धावा मनात दाटून आला होता. सूर्याला आळवत होतो. क्षणभर उघड नयन देवा.

पहाटे अडीच तीन वाजले. चांदोमामानी खिडकीवर टकटक केले, उठा, उठा. मी जी उठले ती परत झोपलेच नाही. त्या चंद्राच्या प्रकाशात दूरवर कांचेनजुंगाचे धूसर अस्तित्व जाणवले. गोरेंना हाक मारली. उठा आज कांचेनजुंगा दिसणार. चंद्राचे, चांदण्यांचे फोटो काढले. अधाशा सारखे प्रत्येक क्षणाचे चित्रण करत होतो. परत हवा बदलली तर ? हळू हळू सूर्य वर येत होता. समोर कांचेनजुंगाचे सौन्दर्य टिपत पॅनोरमा फोटोग्राफी करत गोरे रमले होते. सरते शेवटी कांचेनजुंगाचे दर्शन झाले. हवा तसा फोटो मिळाला. समोरच्या झाडांवर पक्षांची लगबग सुरु झाली. आज त्यांनाही मोकळे आकाश मिळाले होते. बुलबुल, हिमालयन बुलबुल, यूहीना, ट्रिपाय, येलो ब्रेस्टेड स्पॅरोज सगळ्यांनी भेट दिली. शेवटचा दिस खरोखरच गोड झाला. शेवटचा अर्धा तास आमचे सर्व अर्थाने समाधान झाले. चहा नाष्टा करून आम्ही हिरवळीवर कांचेनजुंगा समोर बसून फोटो काढले. मी कांचेनजुंगा समोर बसून क्षणभर उघड नयन गाणं म्हणून घेतलं. मस्त मूड आणि आवाज लागला होता. आर्तता, तृप्ततेने भरल्या आवाजातले अप्रतिम गाणे गाऊन झाले होते. त्याच्या शेवटच्या ओळी होत्या, "अभंग नाही, नाही ओवीं, मूक जिवाने कशी रे गावी, नयना मधले आसू करिती, अखेरचा धावा, देवा उघड नयन देवा."

गाणे म्हणून मी शांत झाले, सावध झाले तेव्हा रिसॉर्टमध्ये काम करण्याऱ्या मुली मागे उभ्या होत्या. त्या माझ्या आवाजाने मागे गोळा झाल्या होत्या. विनय पण आला होताच. मुलींनी आमच्या गळयात रेशमी वस्त्रे घालून

**शुभ यात्रा म्हणून आम्हाला निरोप दिला. आज आम्हाला न्यू जलपैगुडी येथे पोहचायचे होते.**



बाय बाय कांचेनजुंगा (कालूक येथील दृश्य)

**वाटेत शक्य झाल्यास काही पक्षी बघत, फोटो काढत आम्ही जोरथान्ग, मल्लि मार्गे न्यू जलपैगुडी येथे दुपारी २ वाजता पोचलो. विनयला निरोप दिला. कारण त्याला परत गंगटोक येथे जायचे होते. आम्ही वेटिंग रूम कडे आलो. तेथून कलकत्ता येथे जाण्यासाठी आमची गाडी संध्याकाळी ७.३० वाजता होती.**

## बी गार्डन - हावरा ( कलकत्ता )

आम्ही दि. २६ जानेवारी रोजी सकाळी कलकत्ता येथे पोचणार होतो. आमची पुण्याची गाडी त्या दिवशी रात्री १० वा. होती. त्यामुळे आम्हाला दिवसभर रिकामा वेळ होता. आमचे त्या दिवशी रिटायरिंग रूम मध्ये बुकिंग होते. आम्ही सकाळी ६ वा. तेथे गेलो. थोडा आराम केला. आमचे एक मित्र श्री. अनिल जोगदेव यांनी आम्हाला एक माहिती दिली होती. कलकत्ता येथील आचार्य, जगदीश चंद्र बोस, बोटॅनिक गार्डन मध्ये एक प्रचंड वटवृक्ष आहे.




बोटॅनिक गार्डन चे प्रवेशद्वार



दि ग्रेट बन्यन ट्री

ज्याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये आहे. शक्य झाल्यास पाहून या. त्याप्रमाणे आम्ही तेथे जाण्याचे ठरविले. आम्ही सकाळी ९.३० वा. बाहेर पडलो. आमचा मुक्काम हावरा स्टेशनवर होता. जवळच्या बस स्टॅन्डवर गेलो. तेथे चौकशी केली, आचार्य जगदीश चंद्र बोस, बोटॅनिक गार्डन कोठे आहे तेथे कोणती बस जाते. परंतु आम्हाला नीट माहिती मिळाली नाही. नंतर एका गृहस्थाने सांगितले की त्याला येथे बी गार्डन म्हणतात. तुम्ही बी गार्डन विचारा. त्याप्रमाणे आम्हाला हावऱ्याच्या शिबपूर  भागात बी गार्डन आहे असे समजले. लगेच आम्हाला बसही मिळाली व आम्ही १०.३० वा. तेथे पोचलो.




दि ग्रेट बन्यन ट्री

**बगीचा प्रचंड मोठा आहे. तेथे विविध प्रकारचे वृक्ष आहेत. काही परदेशी वृक्ष ही आहेत. त्या सर्वांची माहिती तेथे लिहिलेली आहेच. परंतु मुख्य आकर्षण म्हणजे तेथील वटवृक्ष. ज्याचा उल्लेख गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये आहे. त्या वृक्षाभोवती एक तारेचे कुंपण घालून ट्रॅक बनवला आहे. त्याच्याभोवती फिरून फोटो काढता येतात. ह्या २५० वर्षे जुन्या वटवृक्षाला सुमारे ३६१८ उप मुळं आहेत. ह्या वृक्षाची कॅनोपी सुमारे १७००० sq. mtr. आहे. आम्ही खूप फोटो काढले. वटवृक्षाला जोडीने फेऱ्या घातल्या.**




ब्रॉन्झ विंग्ड जकाना

बागेत फिरण्यासाठी बॅटरीवर चालणाऱ्या रिक्षाची सोय केली आहे. आम्ही रिक्षातून बागेत फिरलो व बागेतील एका तळ्याजवळ उतरलो. पाणवनस्पतीने तळ्याचा संपूर्ण पृष्ठभाग व्यापला होता. अशा प्रकारची जागा म्हणजे ब्रॉन्झ विंग्ड जकाना नावाच्या पाणपक्ष्यांसाठी योग्य परिसर. तेथे जकानाचं एक कुटुंबच पहायला मिळालं. त्यात दोन पिलं होती. ती पाणवनस्पतीवर चालण्याचा प्रयत्न करत होती व वारंवार पाण्यात पडत होती. त्यांची ही कसरत आम्ही बराच वेळ पाहिली, फोटो व व्हिडीओ घेतले. ह्या पक्ष्याच्या पायाची नखं बरीच लांब लांब असतात त्यामुळे त्यांना लिलीच्या पसरट पानांवरती किंवा पाणवनस्पतीवर तोल सांभाळणे सोपे जाते. आम्ही आणखी काही वेळ बागेत फिरलो. दुपारी ३ वाजता हावरा स्टेशनवर परत आलो. थोडी विश्रांती घेतली.

**कॅमेरे बॅगेत बंद केले. महिनाभर घरापासून दूर होतो. आता पुणे दिसू लागले होते. रात्री १० वा. गाडीने हावरा स्टेशन सोडले. आम्ही पुढच्या एखाद्या ट्रिप चे मनातल्या मनात प्लॅनिंग करत झोपी गेलो.**



**पुन्हा येण्यासाठी !**

सिक्किम  यात्रेत, गवसला आम्हा,

अक्षयसा भाता, पाखरांचा

सुरेख रंगीत, सिक्किमचे पक्षी

त्यांचे आम्ही साक्षी, झालो आहो

प्रवासाचे क्षण, अनुभवा आले

शब्दात ओवले, तुम्हासाठी

ओढ अनावर, कांचेनजुंगाची

अनुभवा आली, सुकृताने

कांचेनजुंगाचे, घेऊन दर्शन

तृप्त होता मन, परतलो

सौ. प्रतिभा गोरे



Yuhina



Red Tailed Minla



Blue Throated Barbet



White Browed Fulvetta


Brown Parrotbill

Verditer Flycatcher

Fire Tailed Sunbird

Mrs. Gould's Sunbird

## जग सुंदर आहेच.

पण त्याचे सौंदर्य खुलवणारे शब्द व दृष्टी आपल्याला लेखक, चित्रकार, छायाचित्रकार, कलावंत अणि कवी देतात.

**केशवसुत म्हणतात**

**पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया –**

**सौंदर्यातिशया,अशी वसतसे जादु करांमजि या;**

लेखकांच्या आणि कवींच्या शब्दस्पर्शाने आम्हाला आमच्या आजूबाजूच्या निसर्गातले आणि निर्जीव दगडांतले, पाण्यातले सौंदर्य “जाणवू” लागते. प्रवासवर्णने वाचून आपलेही पाय शिवशिवायला लागतात, त्यांनाही ओढ लागते त्या त्या दिशांची, त्या त्या देशांची.

ई साहित्यचा प्रवासवर्णन विभाग काहींच्या मते खूप समृद्ध आहे. जगातले अनेक देश, भारतातली अनेक राज्ये आणि महाराष्ट्रातले अनेक जिल्हे आणि किल्ले यांची सखोल आणि सचित्र माहिती देणारी शंभरहून अधिक पुस्तके ई साहित्यने प्रकाशित केली. पण आम्ही अजिबातच समाधानी नाही. संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या “मी पाहिलेला…” सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

आपण जिथे कुठे प्रवास केला असेल, त्याचं वर्णन द्या.

आपण आपल्या स्वतःच्या गावाचं वर्णन द्या.

आपण आपल्या आवडत्या कोणत्याही गावाचे, किंवा जिल्ह्याचे वर्णन द्या.

आपलं आजोळ असो वा माहेर किंवा सासुरवाडी, आम्हाला त्याचा महिमा कळवा.

आणि हो, सोबत भरपूर फ़ोटो पाठवा.

तुम्ही पाठवलेली माहिती एखाद्या प्रवाशाला आकृष्ट करेल

किंवा ज्यांनी आधीच प्लॅन केला त्यांना मार्गदर्शक ठरेल

किंवा ज्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरता येत नाही त्यांना सहलीचा आनंद देईल

किंवा परदेशात राहून भारतावर प्रेम करणाऱ्या बंधू भगिनींना आपल्या देशाच्या कोनाकोपऱ्याचं दर्शन घडवेल. कृपया लिहा.

esahity@gmail.com



पक्षी निरीक्षणासाठीचा हा आम्हा उभयतांचा सिक्कीम प्रवास. हा प्रवास आम्ही पश्चिम बंगाल मधून केला. तेथील दोन प्रसिद्ध ठिकाणे म्हणजे गजोलडोबा व लाटपंचर. त्यामुळे पुस्तकात तेथीलही काही फोटो आहेत. हा सर्व प्रवास खरोखरच अवर्णनीय होता व कायमचा लक्षात राहील. आम्हाला ह्या प्रवासात तेथील सम्बंधीतानी जी आत्मीयता दाखवली, त्याबद्दल आम्ही उभयता त्यांचे ऋणी आहोत.



Ferruginous Duck

**Cover Design :** Parag Gore (M : 9890040013)